सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# दिल्लीत कमळ फुललं! 'झाडू'ची जादू फेल अन् काँग्रेसचा सुपडासाफ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकालाचं चित्र स्पष्ट झालं आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार भाजपला ४८ जागा तर आम आदमी पक्षाला २२ जागा मिळाल्या आहेत. मात्र, काँग्रेसला दिल्लीत एकाही जागेवर विजय मिळवता आलेला नाही.१९९३ मध्ये भाजपने पहिल्यांदा दिल्ली निवडणूक जिंकली होती. २७ वर्षानंतर भाजपला दिल्लीचे तख्त पालटण्यात यश आले.



आम आदमी पक्ष आणि भारतीय जनता पक्षाची आकडेवारी पाहता दिल्लीत आता भाजपचाच मुख्यमंत्री होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. कारण दिल्लीत बहुमतासाठी ३६ जागांची आवश्यकता असून भाजपकडे सध्या ४४ जागा आहेत. त्यामुळे आता तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपची सत्ता दिल्लीतआली आहे.देशात सत्ता असतानाही देशाची राजधानी आपल्या ताब्यात नाही याची सल भाजपच्या मनात होती. यासाठी यंदाची निवडणूक काहीही करून जिंकायची यासाठी भाजपचे मोठी फिल्डिंग लावली होती. हीच भाजपची रणनीती आता यशस्वी झाल्याचं पाहायला मिळत आहे.

इंडिया आघाडीमध्ये आम आदमी पक्ष आणि काँग्रेस एकसंघ नसल्याचा मोठा फटका आपला बसला. दिल्लीमध्ये लोकसभा निवडणुकीदरम्यान काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने एकत्रित निवडणूक लढवली होती. तेव्हा सन्मानजनक मतदानाची टक्केवारी मिळाली होती. मात्र, विधानसभा निवडणूक ही वेगवेगळी लढवली आणि दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी एकमेकांवर गंभीर आरोप प्रत्यारोप केले.

## 'भाजप' २७ वर्षांनंतर सत्तेत!

### दिल्लीतील विजयानंतर पंतप्रधान मोदी आज कार्यकर्त्यांना संबोधित करणार

स्पष्ट बहुमतासह मोठ्या विजयाकडे दिल्लीत भाजपची घोडदौड सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजप मुख्यालयात संध्याकाळी ७.३० वा कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत.


दुसरीकडे अरविंद केजरीवाल यांच्यासह अरविंद केजरीवाल यांच्या टीममधील प्रमुख नेत्यांना तुरुंगात जावे लागले. केवळ अरविंद केजरीवाल नव्हे तर अरविंद केजरीवालांच्या मंत्रिमंडळातील प्रमुख चेहऱ्यांना तुरुंगात जावे लागले. मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरण केजरीवालांना चांगलेच भोवले. सोबतच भाजपच्या सूक्ष्म नियोजनाचा पत्ताच आम आदमी पक्षाला लागला नाही.

दुसरीकडे भाजपने सगळ्याच निवडणुकांप्रमाणे अत्यंत सूक्ष्म नियोजन या निवडणुकीचे केले होते. दिल्लीत देशाच्या सर्व भागातील लोक राहतात. या सर्व भागातील मतदाराला आकर्षित करण्यासाठी देशाच्या सर्व भागातून नेतेमंडळी भाजपने दिल्लीत बोलावली. या सगळ्या नेत्यांनी दिल्लीतील मतदारांशी संवाद साधला. राज्यात आणि केंद्रात एकच सरकार असल्यास विकास गतीने होऊ शकतो, ही भावना रुजवण्यासाठी घरोघरी जाऊन संवाद साधला. छोट्या छोट्या बैठका घेतल्या, याचा फायदा भाजपाला झाला. अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या संपूर्ण टीमवर पद्धतशीरपणे नियोजनबद्ध हल्ले चढवण्यात आले, अरविंद केजरीवाल यांचे शीशमहल अथवा मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरण अशी एक एक प्रकरणे आम आदमी पक्षाच्या विरुद्ध भाजपने पद्धतशीरपणे समोर आणली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ज्या योजना आम आदमी पक्षाच्या होत्या त्या योजना आम्ही बंद करणार नाही, त्या सुरूच ठेवून त्यासोबत आणखी चांगल्या योजना दिल्लीकरांना देऊ असे भाजपने म्हटले होते. या सगळ्या गोष्टी अरविंद केजरीवालांच्या विरुद्ध गेल्याचे निकालातून दिसून येते.

# दिल्लीचा विजय विकासाचा आणि सुशासनाचा ऐतिहासिक विजयानंतर पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल आज लागला. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षानं मोठा विजय मिळवलाय. या निवडणुकीत आम आदमी पक्षाचा दारूण पराभव झालाय. भाजपच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिलीय. निकालावर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान मोदींनी दिल्लीच्या जनतेचे आभार मानलेत. दिल्लीत विकासाचा विजय झालाय. सुशासनाची विजय झाला. दिल्लीच्या विकासात आम्ही कोणतीच उणीव ठेवणार नाही, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.



जनशक्ति सर्वोपरि!
विकास जीता, सुशासन जीता।

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पंतप्रधान मोदींनी दिल्लीच्या विजयावर एक पोस्ट लिहिलीय. जनशक्ती, सर्वोपरी! विकासाचा विजय झालाय. सुशासन जिंकलय. भाजपला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यासाठी दिल्लीतील बंधू आणि बहिणींचे आभार. तुम्ही जे भरपूर आशीर्वाद आणि स्नेह दिलंय त्यासाठी तुम्हा सर्वांचे आभार. दिल्लीचा चहूबाजुंनी विकास करून येथील लोकांचे जीवन उत्तम करण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करू. ही आमची गॅरंटी आहे. यासह विकसीत भारत निर्माण करण्यात दिल्लीची मोलाची भूमिका असेल.

याचबरोबर पंतप्रधान मोदींनी भाजपच्या कार्यकर्त्यांनाही त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. मला भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांचा गर्व आहे. भाजपला मोठं मताधिक्य मिळावे यासाठी त्यांनी दिवस–रात्र काम केलं. आता आम्ही अजून सशक्तपणे दिल्लीकरांची सेवा करू असं मोदी म्हणालेत.

# दिल्लीत भ्रष्टाचाराचा 'शीशमहल' उद्ध्वस्त; विजयानंतर अमित शाह यांचा केजरीवालांवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आतापर्यंत आलेल्या कलांनुसार भाजपला निर्विवाद बहुमत मिळणार, हे स्पष्ट झालं आहे. मतमोजणीच्या अवघ्या काही फेऱ्या बाकी असताना भाजपने ४५ हून अधिक जागांवर आघाडी घेतल्याने तब्बल २७ वर्षांनंतर देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत भाजपची सत्ता येणार, हे निश्चित झालं आहे. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाचा दारुण पराभव केल्यानंतर भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या कार्यकर्त्यांचं अभिनंदन करत केजरीवाल यांच्यावर हल्लाबोल केला



आहे.

दिल्ली विधानसभा निवडणूक निकालावर भाष्य करताना अमित शाह म्हणाले की, दिल्लीच्या हृदयात नरेंद्र मोदी आहेत. दिल्लीच्या जनतेनं खोटारडेपणा, धोकेबाजी आणि भ्रष्टाचाराचा 'शीशमहल' उद्ध्वस्त करत दिल्लीला संकटमुक्त केलं आहे. जे लोक दिलेली आश्वासने पाळत नाहीत, अशा लोकांना दिल्लीच्या जनतेनं धडा शिकवला आहे, असा टोला शाह यांनी लगावला आहे.

दिल्लीमध्ये आता विकास आणि विश्वासाचं एक नवं युग सुरू होणार आहे. दिल्लीत असत्याच्या सरकारचा शेवट झाला आहे. हा अहंकार आणि अराजकतेचा पराभव आहे. हा दिल्लीवासीयांनी मोदींची गॅरंटी आणि मोदींच्या विकासाच्या व्हिजनवर दाखवलेल्या विश्वासाचा विजय आहे. या प्रचंड विजयाबद्दल दिल्लीकरांचे मन:पूर्वक आभार.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजप सर्व आश्वासनांची पूर्तता करून दिल्लीला जगातील सर्वोत्तम राजधानी बनवण्यासाठी कटिबद्ध आहे. लोकांनी मतदानातून दूषित झालेली यमुना नदी, पिण्याचे अस्वच्छ पाणी, खराब रस्ते आणि गल्लोगली निर्माण झालेल्या दारुच्या अड्ड्यांविरोधात आपला रोष व्यक्त केला आहे, अशी टीकाही अमित शाह यांनी आम आदमी पक्षावर केली आहे.दरम्यान, दिल्ली विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या या दणदणीत विजयाबद्दल मी दिल्ली भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांचं, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांचं अभिनंदन करतो. महिलांचा सन्मान, कॉलोनी वासियांचा स्वाभिमान आणि स्वयंरोजगाराच्या संधींसह मोदींच्या नेतृत्वात दिल्ली आता एक आदर्श राजधानी होईल, असंही अमित शाह म्हणाले.

# दिल्लीत काँग्रेसचा लाजिरवाणा पराभव! काँग्रेसच्या ० जागा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असून आतापर्यंत निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार भाजपला बहुमत मिळत असल्याचे दिसून येत आहे. तर दुसरीकडे काँग्रेसने आतापर्यंत एकाच एका जागेवर आपले खाते उघडले होते, परंतु आता त्या जागेवरही काँग्रेस पिछाडीवर आहे. एकंदरित काय तर दिल्लीत काँग्रेसचा लाजिरवणार पराभवाला सामोरे जावं लागत आहे. दिल्लीच्या बादली जागेवर काँग्रेस आघाडीवर होती, पण आता काँग्रेस पुन्हा शून्यावर पोहोचली आहे. काँग्रेसने येथून देवेंद्र यादव यांना उमेदवारी दिली आहे.मतमोजणीदरम्यान मिळालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या बादली विधानसभा




मतदारसंघात आता बदल दिसून येत आहे. येथून उमेदवार देवेंद्र यादव आता पिछाडीवर आहे. राहुल गांधी आणि प्रियंका वाड्रा दोघांनीही बादली मतदारसंघात त्यांच्या उमेदवाराच्या बाजूने प्रचार केला.या विधानसभा जागेवर आम आदमी पक्षाने आपला जुना उमेदवार अजेश यादव यांना उमेदवारी दिली आहे. त्याच वेळी भाजपने बादली मतदारसंघातून अहिर दीपक चौधरी यांच्या नावावर विश्वास व्यक्त केला होता, तर काँग्रेसने पुन्हा एकदा या जागेवर त्यांचे माजी उमेदवार देवेंद्र यादव यांना संधी दिली होती.

# आम आदमी पक्षाला मोठा धक्का;अरविंद केजरीवाल, मनिष सिसोदिया 'आप'टले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीची मतमोजणी आज (८ फेब्रुवारी) सुरु आहे. पुढील काही तासांत दिल्लीच्या निकालाचं चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र, दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला आहे. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्रवेश वर्मा यांनी नवी दिल्ली मतदारसंघामधून अरविंद केजरीवाल यांचा पराभव केला आहे. अरविंद केजरीवाल यांचा पराभव हा आम आदमी पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे.



दरम्यान, दुपारपर्यंत समोर आलेल्या आकडेवारीनुसार, दिल्लीत भारतीय जनता पक्ष ४६ जागांवर आघाडीवर आहे, तर आम आदमी पक्ष २४ जागांवर आघाडीवर आहे. खरं तर दिल्लीच्या निवडणुकीत भाजपा आणि आम आदमी पक्षात मोठी चुरस पाहायला मिळाली. मात्र, या निवडणुकीत दिल्लीच्या जनतेने आम आदमी पक्षाला नाकारल्याचं पाहायला मिळत आहे.

**मनिष सिसोदिया यांचा पराभव**

आम आदमी पक्षाचे मनिष सिसोदिया जंगपुरा मतदारसंघातून निवडणूक लढवत होते. मात्र, मनिष सिसोदिया यांचाही पराभव झाला आहे. तरविंदर सिंग मारवाह या ठिकाणाहून विजयी झाले आहेत. याआधी दोन निवडणुका मनिष सिसोदिया जिंकले होते. त्यांनी पटपडगंजमधून निवडणूक लढवली होती. यावेळी मात्र सिसोदियांचा पराभव झाला आहे. त्यांना हरवणारे मारवा २०२२ भाजपात आले होते. त्याआधी ते काँग्रेसमध्ये होते तसंच माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्या निकटवर्तीयांपैकी एक मानले जात होते. मारवा हे भाजपाच्या शिख नेत्यांपैकी एक महत्त्वाचे नेते आहेत.

# दिल्ली विधानसभेत अजित पवारांच्या सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

## पक्षाला केवळ ०.०३ टक्के मते; फुटीनंतर दिल्लीत पहिली निवडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाचा मोठा पराभव झाला आहे. दिल्लीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ३० उमेदवार उभे केले होते. या सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. पक्षाला या निवडणुकीत केवळ ०.०३ टक्के मते मिळाली आहेत. एकाच टप्प्यात झालेल्या दिल्लीतील मतदानानंतर आज निकाल जाहीर झाले आहेत.

लोकसभा निवडणुकीत इंडिया ब्लॉकचा भाग असलेल्या पाच पक्षांनी देखील एकमेकांविरुद्ध निवडणूक लढवली. तर दुसरीकडे एनडीएचा भाग असलेल्या अजित पवार यांच्या पक्षानेही दिल्लीत स्वबळावर निवडणूक लढवली. यात पक्षाचे ३० ठिकाणी उमेदवार घोषीत केले होते. महाराष्ट्रात भाजपचा मित्रपक्ष असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (NCP) ३० जागा लढवल्या. मात्र, शिवसेना प्रमुख



आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जागांवर भाजपला पाठिंबा दिला होता.अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्रातील भाजप महायुती सरकारचा मित्रपक्ष आहे. अजित पवार हे स्वतः महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत. मात्र, त्यांनी दिल्लीत भाजपशी युती केलेली नाही. राष्ट्रवादीला दिल्लीत आपले अस्तित्व निर्माण करता यावे यासाठी अजित पवार यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता, असे मानले जाते. आम आदमी पक्ष, भाजप आणि काँग्रेसचे वर्चस्व दिल्लीत दिसून येत असले तरी यात आपले नशीब आजमावण्याचा निर्णय अजित पवार यांनी घेतला होता.राष्ट्रवादीने यापूर्वी महाराष्ट्राबाहेर राज्याच्या निवडणुका लढवल्या आहेत, मात्र दिल्लीत त्यांना फारसे यश मिळाले नाही. २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत, संयुक्त राष्ट्रवादी काँग्रेसने पाच जागा लढवल्या होत्या. परंतु एकही जागा जिंकण्यात त्यांना यश आले नव्हते. जुलै २०२३ मध्ये अजित पवार आणि शरद पवार गटात राष्ट्रवादीचे विभाजन झाल्यानंतर दिल्लीतील ही पक्षाची पहिलीच निवडणूक होती. मात्र, या निवडणुकीतही त्यांना फारसे यश आले नाही.

# और लडो आपस में...! उमर अब्दुल्लांचा काँग्रेस-आप वर निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८जम्मू काश्मीर**

आज दिल्ली विधानसभा निवडमुकीचे निकाल येत आहेत. सर्व ७० जागांवरील कल समोर आले आहेत. आतापर्यंतत्या निकालात भाजपला मोठी आघाडी मिळताना दिसत आहे. यातच आता जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी काँग्रेस आणि आपवर निशाणा साधला आहे. और लडो आपस में, असे उमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे.

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी सुरुवातीला आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांच्या



आघाडीसंदर्भात चर्चा सुरू होती. मात्र प्रत्यक्षात असे होऊ शकले नाही. दिल्लीपूर्वी हरियाणामध्येही काँग्रेस आणि आप यांच आघाडी होऊ शकली नव्हती. तेव्हा हरियाणामध्ये भाजपला सलग तिसऱ्यांदा विजय मिळाला. यामुळे, आता पुन्हा एकदा दिल्लीच्या निकालात भाजपला मिळत असलेल्या आघाडीवरून उमर अब्दुल्ला यांनी आप आणि काँग्रेसवर अशा शब्दात साधलेला हा निशाणा बरेच काही सांगणार आहे.

**शेअर केला 'महाभारत' मालिकेतील सीन**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर 'महाभारत' मालिकेतील एक सीन शेअर करत उमर अब्दुल्ला यांनी केवळ और लडो आपस में! एवढेच लिहिले आहे. आज येत असलेले दिल्ली विधानसभेचे निकाल आणि त्यांची ही पोस्ट, यावरून दिल्लीमध्ये काँग्रेस आणि आपने वेगवेगळे निवडणूक लढण्याच्या घेतलेल्या निर्णयावर आहे, हे स्पष्ट होते.

## संपादकीय ......

# भारतीयांची घरवापसी

जगाशी व्यापारी संबंध जोडताना केवळ अमेरिकेचे हित (अमेरिका फर्स्ट) बघणे, हे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे आवडते धोरण आहे. स्थलांतरितांना तीव्र विरोध ही त्यांची विचारसरणी आहे. म्हणूनच मेक्सिकोच्या सीमेवर भिंत बांधण्याच्या घोषणा करण्यापासून ते सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांना हाकलून देण्यापर्यंतची गर्जना करण्यापर्यंतच्या कारवाया ट्रम्प यांनी सत्तेवर येताच लगोलग केल्या. अमेरिका हा मूलतः स्थलांतरितांमधूनच आकाराला आलेला देश आहे. अमेरिकेत सुमारे १ कोटी १० लाख स्थलांतरित आहेत. या सर्वांना हद्दपार केल्यास लोकांना ज्या विविध सेवा स्वस्तात मिळतात, त्या मिळणार नाहीत. त्यामुळे सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांना विमान, जहाज वा बसमधून देशाबाहेर काढण्याऐवजी निवडक कारवाई करणे, हीच ट्रम्प यांची व्यूहरचना असेल. त्यामुळे त्यांचे समर्थकही खूश होतील आणि बाकी जनतेला महागाईस तोंडही द्यावे लागणार नाही. कारण, स्थलांतरित हे कमी पैशात विविध कामे करतात आणि अल्पदरात सेवा पुरवतात, हा जगभरचा अनुभव आहे. जागतिकीकरणामुळे मजुरांचे स्थलांतर वाढले; पण ट्रम्प यांचा मुळात जागतिकीकरणासच विरोध आहे. याचा अर्थ, कुणी बेकायदेशीर स्थलांतराचे समर्थन करावे, असे नाही; मात्र वास्तवही नजरेआड करता येत नाही. आता अमेरिकेतील भारतीय स्थलांतरितांना परत पाठवण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, सी-१७ या अमेरिकन लष्कराच्या विमानातून टेक्सासमधील सॅन अँटानियो येथून २०५ बेकायदा स्थलांतरितांना भारतात पाठवण्यात आले.पंतप्रधान नरेंद्र मोदी फेब्रुवारीतच अमेरिकेचा दौरा करत असून, त्यापूर्वीच हे पाऊल उचलण्याची घोषणा ट्रम्प यांनी केल्यानंतर भारतात धाडण्यात येणारा हा पहिला गट आहे. खरे तर, जो बायडेन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असतानाही गेल्या वर्षी १,१०० बेकायदेशीर स्थलांतरितांना विशेष विमानांनी भारतात धाडले होते; पण त्यावेळच्या प्रशासनाने याची जाहीर चर्चा केली नाही वा त्याचे विद्वेषी राजकारणही केले नाही. आता अमेरिकेच्या स्थलांतर विभागाचे अधिकारी २० हजार बेकायदा भारतीय स्थलांतरितांना परत धाडण्यास सज्ज आहेत. अमेरिकेत एकूण सव्वासात लाख भारतीय कोणत्याही कागदपत्रांशिवाय रहिवास करत आहेत. मोदी यांच्यासोबत झालेल्या चर्चेत त्यांनी आपल्याला जे योग्य असेल, ते करण्यास सांगितले आहे. ते बेकायदा स्थलांतरितांना परत घेण्यास तयार आहेत, असेही ट्रम्प यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. जानेवारीत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांची यासंदर्भात भेट घेतली होती. त्यावेळी बेकायदा स्थलांतरितांची पडताळणी करून त्यांना परत घेण्यास तयार असल्याचे जयशंकर यांनी थेटपणे सांगितले होते. बेकायदा स्थलांतर हे अनेकदा गुन्हेगारी कृत्यांशी संबंधित असल्याने ते आमच्या प्रतिमेसाठी इष्ट नाही, अशी भारताची भूमिका असून, ती योग्यच आहे. भारतात बेकायदेशीरपणे राहणारे रोहिंग्या आणि बांगला देशीयांविरोधात मोहीम सुरू केली जाते, तेव्हा आपल्यालाही दुसर्या देशात कोणत्याही अनधिकृतपणे राहणार्या भारतीयांचे समर्थन करता येत नाही, असे जयशंकर यांनी म्हटले होते. आज महाराष्ट्रात मुंबईपासून मालेगावपर्यंत असंख्य बांगला देशी राहत आहेत. त्यांना आधार कार्ड, पॅन कार्ड वा रेशन कार्ड देणारे आपलेच भ्रष्ट अधिकारी असतात, हे लक्षात घ्यावे लागेल.

देशात ईशान्येकडील राज्यांत तर ही समस्या मोठ्या प्रमाणात आहे. दुसरीकडे, भारतातून अमेरिका वा अन्य देशांत गेलेले अनेकजण हे छुपेपणाने तिकडे गेलेले असतात. त्यापैकी काहीजण ड्रग्ज, बंदुकांचा व्यापार, तस्करी अशा गैरव्यवहारांतही गुंतलेले असू शकतात. अशांचे कोणतेही समर्थन करण्याचे कारण नाही. आता अमेरिकेतून स्थलांतरितांना घेऊन आलेले पहिले लष्करी विमान अमृतसरला उतरवले गेले. स्थलांतरितांना विदेशात पाठवणार्या काही टोळ्या असून, त्यांचा तपास भारतीय यंत्रणांना लावावा लागेल. कारण, जोपर्यंत या टोळ्या पूर्णपणे नेस्तनाबूत केल्या जात नाहीत, तोपर्यंत नवनवीन लोकांना चोरीछुप्या मार्गाने अमेरिकेत धाडले जाणे थांबणार नाही. थोडक्यात, कैक वर्षांपासून हे उद्योग सुरू आहेत आणि अधिकृत स्थलांतरितांमध्ये पंजाब व गुजरातमधील लोकांची संख्या अधिक आहे. पंजाबमधून मोठ्या प्रमाणात लोक कॅनडातही जातात. त्यापैकी काहीजण भारतविरोधी खलिस्तानवादी कारवायांमध्ये गुंतलेले आहेत. त्यांच्या विरोधात कृती करा, असे आवाहन भारताने कॅनडा सरकारला वारंवार केले; मात्र आता ज्यांना अमेरिकेतून धाडले आहे, त्यांना हातात बेड्या घालून अपमानकारकरीत्या पाठवले गेल्याचा आरोप केला जात आहे. तो खरा असेल, तर भारत सरकारने त्याबाबत अमेरिकन प्रशासनास जाब विचारला पाहिजे.-

# शेत पाणंद रस्त्याचा मार्ग मोकळा; शेतरस्त्यासाठी नागपूर पॅटर्न राबवणार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती –** राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, अशी सूचना देत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट आदेश दिले आहेत.

शिवपाणंद आणि शेत रस्ते समृद्ध करण्याबाबत पब्लिक डोमेनच्या माध्यमातून नागरिकांच्या सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली.

जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

शेत्रास्त्यासाठी निर्णय

१) शिवपाणंद व शेत रस्त्यांची कामे दर्जेदार करा.

२) ग्रामस्तरीय शेतरस्ता समिती स्थापन करणार.

३) पाणंद रस्त्यांची प्रलंबित प्रकरणे महिनाभरात निकाली काढणार.

४) मोजणीसह पोलीस संरक्षणासाठीची फी बंद करणार.

## नागपूर पॅटर्न राबवणार

महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, नागपूर जिल्ह्यात प्रती किलोमिटर केवळ आठ ते दहा लाख रुपये खर्चामध्ये उत्कृष्ट पाणंद रस्ते बनविण्यात आले आहेत. या कार्यपद्धतीचा सर्व जिल्ह्यांनी अभ्यास करून इतर जिल्ह्यांमध्येही याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच ग्रामस्तरीय शेतरस्ता समिती स्थापन करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा. रस्त्यांचे काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी. पाणंद रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत.

मोजणीसह पोलीस संरक्षणासाठीची फी बंद करणार

पाणंद रस्ते, शेतरस्ते, सार्वजनिक वहीवाटीच्या रस्त्यांच्या मोजणी आणि पोलीस संरक्षणासाठी असलेली फी बंद करण्याचा विचार करण्यात येईल असे सांगून श्री. बावनकुळे म्हणाले, अशा रस्त्यांच्या नंबरींगचे सर्वेक्षण करुन नंबरींग हटवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

रस्त्यांच्या प्रकरणी तहसीलदारांच्या निर्णयावर उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अपील केल्यानंतर त्यांनीच अंतिम निकाल देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे सांगून शेतरस्त्यांचा उल्लेख झाल्याशिवाय वाटप पत्र मंजूर करण्यात येऊ नये यासाठीही शासन सकारात्मक असल्याचे सांगितले.




## रात्री जेवण केल्यावर किती तासांनी झोपणं योग्य? पाहा योग्य वेळ आणि त्याचे फायदे

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

प्रत्येक गोष्टीची एक योग्य वेळ असते. दैनंदिन जीवनातील रोजची कामं त्या त्या वेळी केली गेली नाही तर आरोग्यासंबंधी वेगवेगळ्या समस्या होऊ शकतात. जेवण करणं हे आपल्या रोजच्या जीवनातील एक महत्वाचं काम आहे. योग्यवेळी जेवण केलं तर आरोग्य चांगलं राहतं. अनेकांना जेवणाची योग्य वेळच माहीत नसते किंवा माहीत असेल तर ती वेळ फॉलो केली जात नाही. रात्रीच्या जेवणात आणि झोपण्याच्या वेळ योग्य अंतर ठेवलं गेलं नाही तर आरोग्यासंबंधी अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. आयुर्वेदानुसार, जेवण केल्यानंतर लगेच झोपण्याची सवय तुमच्यासाठी नुकसानकारक ठरू शकते. अशात जेवणात आणि झोपण्याच्या वेळेत किती तासांचं अंतर असाव हे जाणून घेऊ.

**जेवल्यावर किती तासांनी झोपावं?**

हेल्थ एक्सपर्ट्सनुसार, रात्री जेवण केल्यावर साधारण दोन ते तीन तासांनंतरच झोपायला हवं. त्याशिवाय जेवण केल्यावर लगेच बेडवर पडून राहणंही टाळलं पाहिजे. जेवण झाल्यावर थोडावेळ वॉक करणं गरजेचं असतं. निरोगी राहण्यासाठी जेवण केल्यावर साधारण १० ते १५ मिनिटं वॉक करणं गरजेचं आहे.

**रात्रीच्या जेवणाची योग्य वेळ**

आयुर्वेदानुसार, सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत जेवणाची योग्य वेळ असते. रात्री ९ वाजतानंतर जेवण करू नये. जर तुम्ही रात्री ८ वाजता जेवण करत असाल तर १० ते ११ वाजता झोपायला हवं. तेव्हा तुम्ही ७ ते ८ तासांची झोप घेऊ शकता. हे




रूटीन फॉलो केलं तर इम्यून सिस्टीमही मजबूत राहतं.

**आरोग्याचं होईल नुकसान**

जर तुम्ही रात्री उशीरा जेवण करत असाल किंवा जेवणानंतर लगेच झोपत असाल, तर यानं आरोग्याचं नुकसान होऊ शकतं. रात्री जेवण केल्यावर लगेच झोपल्यानं गेट हेल्थ डॅमेज होऊ शकते आणि तुम्हाला पोटासंबंधी वेगवेगळ्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. जेवण केल्यानंतर लगेच झोपल्यानं तुमच्या स्लीप सायकलवरही वाईट प्रभाव पडतो. तसेच ही चूक नेहमीच केली तर पचन तंत्रही बिघडतं आणि वजनही वाढतं.

# रासायनिक खतांच्या अतिवापराने जमिनीवर नक्की काय परिणाम होतो? वाचा सविस्तर




**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक**

रासायनिक खतेशेतीत उत्पादन वाढविण्याचे एक प्रभावी साधन म्हणून वापरली जातात. मात्र या खतांचा अतिवापर जमिनीच्या आरोग्यावर आणि पर्यावरणाच्या संतुलनावर गंभीर परिणाम करतो.

**रासायनिक खतांच्या अतिवाराचे दुष्परिणाम**

१. अल्पकालीन फायदा जरी दिसत असला तरी, दीर्घकाळात या रासायनिक खतांमुळे मातीची उत्पादकता, पोषणमूल्य, आणि पर्यावरणीय स्थिरता यांवर घातक परिणाम होतो.

२. रासायनिक खतांचा वारंवार वापर जमिनीच्या नैसर्गिक सुपीकतेवर वाईट प्रभाव करतो. यामुळे मातीतील जैविक घटक, जसे की सेंद्रिय पदार्थ, सूक्ष्मजीव, आणि गांडुळ यांची संख्या कमी होते. परिणामी, जमिनीची जैविक गुणवत्ता कमी होते आणि पोषणद्रव्येही नष्ट होतात.

३. खतांमधील रासायनिक घटक सूक्ष्मजीवांना हानी पोहोचवतात, ज्यामुळे सेंद्रिय पदार्थांचे विघटन आणि पोषणमूल्यांची पुनर्रचना मंदावते.

४. रासायनिक खतांमध्ये नायट्रोजन, फॉस्फरस, आणि पोटॅशियम (छझघ) सारखी महत्त्वाची पोषणद्रव्ये असतात, जी पिकांच्या वाढीसाठी आवश्यक आहेत. पण यांचा जास्त वापर केल्यास मातीतील सूक्ष्मजीवांवर वाईट परिणाम होतो.









५. सूक्ष्मजीव मातीतील पोषक द्रव्यांचे विघटन करून पिकांसाठी उपलब्ध करतात. रासायनिक घटकांमुळे सूक्ष्मजीवांचे कार्य कमी होते. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीची संरचना खराब होते.

६. मातीतील गाळ, वाळू, आणि चिकणमातीचे प्रमाण बिघडते, ज्यामुळे मातीची जलधारणा क्षमता कमी होते. हे मुळांच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या मातीतील हवेशीरतेवर देखील परिणाम करते. यामुळे मातीची पाण्याची साठवण क्षमता कमी होते.

७. रासायनिक खतांचा दीर्घकाळ वापर मातीच्या सामू वर परिणाम करतो. काही रासायनिक खते मातीची आम्लता वाढवतात, ज्यामुळे मातीचा सामू कमी होतो (माती आम्लीय बनते). यामुळे पिकांच्या पोषणासाठी आवश्यक असलेल्या पोषक तत्त्वांची उपलब्धता कमी होते.

८. काही खते जमीन अल्कधर्मीय बनवतात, ज्यामुळे पोषक तत्त्वांचा समतोल बिघडतो. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे सुरुवातीला उत्पादन वाढते, पण नंतर मातीची उत्पादकता कमी होत जाते. शिवाय, पिकांमधील पोषणमूल्य घटते, ज्याचा परिणाम अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता यावर होतो.

९. रासायनिक खतांमुळे जैवविविधता कमी होते. मातीतील सूक्ष्मजीव, गांडूळ, आणि कीटक यांवरही रासायनिक घटकांचा वाईट परिणाम होतो. या सजीवांमुळे मातीचा पोत राखला जातो आणि जमिनीची उत्पादनक्षमता वाढत असते. जर हे सजीव नष्ट झाले, तर मातीची उत्पादकता कमी होते आणि जैवविविधतेचा ऱ्हास होतो.

# १४ ते १८ फेब्रुवारी दरम्यान सायन्सकोर मैदानावर जिल्हास्तरीय कृषी विकास परिषद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती**

कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा यांच्यावतीने दि. १४ ते १८ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरीय कृषी विकास परिषद आणि प्रदर्शनीचे आयोजन सायन्स स्कोर मैदानात करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषीविषयक तंत्रज्ञान, बियाणे, खते, औषधे, औजारे यांची अद्ययावत माहिती व्हावी यासाठी प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे.

प्रदर्शनीचे उद्घाटन कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते होणार आहे. कृषी विकास परिषदेमध्ये पीक परिसंवाद, चर्चासत्र, विविध कृषी निविष्ठांचे स्टॉल, महिला बचतगट उत्पादीत वस्तूंचे प्रदर्शन, तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल, यासह सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहे. प्रदर्शनीला नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# आकाश फुंडकर यांची प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाला भेट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती:**

महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री मा. ना. आकाशजी फुंडकर यांनी आज अमरावती शहरातील भाजपा शहर अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी भाजपा सदस्यता नोंदणी अभियान उपक्रमाच्या संदर्भात शहरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.मा. ना. फुंडकर यांनी प्रदेश पदाधिकारी, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, मोर्चा अध्यक्ष, प्रकोष्ठ, सेल, आघाडी संयोजक आणि पदाधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन विविध विषयांवर मार्गदर्शन केले.यावेळी भाजपा अमरावती शहर अध्यक्ष श्री प्रविण पोटे पाटील यांनी उपस्थित भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांना मार्गदर्शन करत शहरातील जास्तीत जास्त नागरिकांना भाजपा सोबत जोडण्याचे आवाहन केले. प्रविण पोटे पाटील यांनी शहरातील नागरिकांपर्यंत सरकारच्या योजना व उपक्रम पोहोचवण्याचे महत्त्व सांगितले. तसेच आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच, पक्ष संघटनेच्या कार्यावर चर्चा सुध्धा केली.या बैठकीमध्ये जयंत डेहनकर, चेतन पवार, सतिश करेसिया, विवेक कलोती, अनिता राज, कौशिक अग्रवाल, बादल कुळकर्णी, सौ गंगाताई खारकर , सौ लताताई देशमुख, श्री विवेक गुल्हाने, नितीन गुडधे, धनराज चक्रे, श्री लखन राज, श्री प्रकाशजी पुंड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण


# ‘फ्रीडम ऑफ स्पीच’ अंतर्गत कुणीही करू शकते आरोप

## किरीट सोमैयांच्या प्रश्नांवर जिल्हाधिकाऱ्यांनी केले स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** अंजनगांव सुर्जी तहसील मधील बांग्लादेशी बनावट जन्म प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या प्रकरणात एसआयटीचा रिपोर्ट पुढील आठवड्या पर्यंत प्राप्त होईल, असे संकेत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले. भाजपचे वरिष्ठ नेते आणि माजी राज्यसभा सदस्य किरीट सोमय्या यांनी गुरुवारला अंजन गाव सुर्जी पोलिस ठाणे येथे पोहोचून पुरावे सादर करीत





औपचारिकतारदाखल केली, यावेळी किरीट सोमय्यायांनी केलेल्या आरोपावर जिल्हाधिकारी म्हणाले की,फ्रीडम ऑफ स्पीच अधिकार सर्वांना आहे. त्यामुळे किरीट सोमय्या यांना आरोप करण्यापासून कुणीही रोखू शकत नाही. तथापि त्यांनी आम्हाला कोणतेही पुरावे दिले नाही. आम्ही किरीट सोमैया यांनी केलेल्या आरोपानुसार एक एसआयटी स्थापन केली आहे. त्यांनी केलेल्या आरोपाची चौकशी करण्यात येत आहे.

पुढील आठवड्यापर्यंत एसआयटी अहवाल मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, या अहवालात जो दोषी आढळेल त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. मात्र जोपर्यंत अहवाल मिळणार नाही, तोपर्यंत प्रशासन कोणतीच कारवाई करू शकणार नाही.

उल्लेखनीय असे की, किरीट सोमय्या यांनी सादर केलेल्या एका पुराव्या स्पष्ट केले की, अंजनगांव सर्जी तहसील मध्ये जन्म प्रमाणपत्र सादर करणाऱ्या एका व्यक्तीने अंजनगांव सुर्जीमधील उर्दू स्कूलची टीसी दिली होती. या व्यक्तीचा जन्म वर्ष १९३२ मध्ये झाला आणि त्याने उर्दू स्कूलमध्ये वर्ष १९३८ मध्ये प्रवेश घेतला. सोबतच या व्यक्तीने १९४५-४६ मध्ये ही शाळा सोडून दिली होती. त्यावेळी कॉम्प्युटर अस्तित्वात नव्हते. पण या व्यक्तीने कॉम्प्यूटरवर बनलेली टीसी आपल्या अर्जासह जोडलेली आहे.याचा अर्थ सरळ आहे की कॉम्प्युटर वर बनावट टीसी तयार करण्यात आली.

### १२९ लोकांचे बनावट जन्म प्रमाणपत्र

किरीट सोमैया यांनी आरोप केला की, सन २०२३ ते आतापर्यंत अंजनगांव सुर्जी तहसील कार्यालयात जन्म प्रमाण पत्रासाठी १४८४ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांच्याकडून ५८५ आवेदकांना जन्म प्रमाणपत्रदेण्यात आले. १०० लोकांचे जन्म प्रमाणपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया पूर्ण झालीआहे. किरीटसोमय्यायांच्यामते, ज्या ५८५ लोकांचे जन्म प्रमाणपत्र वाटप केले, त्यात १२९ बांग्लादेशी घुसखोर आहेत. या १२९ लोकांपैकी १०० जणांचे पुरावे आपल्याकडे आहेत, असा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे पोलिस स्टेशनला तक्रा रदिल्याचे त्यांनी सांगितले.

### तपासानंतरच कारवाई

या संदर्भात पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्यासोबत चर्चा केली असता ते म्हणाले की, याप्रकरणी अहवालातून जे काही निष्कर्ष निघतील, त्या आधारावर कारवाई करण्यात येईल. सध्या या प्रकरणाचा तपास सुरु असून अहवालाची प्रतीक्षा करण्यात येत आहे, असे पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी सांगितले.

# सिटी ई-गव्हर्नन्स सर्वेमध्ये २९ मनपांना मागे टाकले


## अमरावती मनपाचा राज्यात सहावा क्रमांक

## मनपा आयुक्तांनी केले कर्मचाऱ्यांचे कौतूक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती –** राज्यातील महानगर पालिकांच्या सिटी ई गव्हर्नन्स निर्देशांकात अमरावती







महानगरपालिकेने सहावा क्रमांक मिळवला आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये अमरावती मनपाने सहावे स्थान मिळवले आहे. नागरिकांना आवश्यक असलेल्या पारदर्शक सेवा यापुढेही देण्याकरिता मनपाप्रयत्नरत राहील असा विश्वास मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी व्यक्त केला आहे. भारत सरकार व राज्य सरकारचे ई गव्हर्नन्स धोरण युनायटेड नेशनचे ई गव्हर्नन्स अहवाल यांचा अभ्यास करुन दरवर्षी ई गव्हर्नन्स इंडेक्सचे निकष ठरविण्यात येतात.यामध्ये अमरावती मनपाने राज्यातील नवी मुंबई, कल्याण डोंबीवली, ठाणे, नाशिक, सोलापूर, वसई विरार, पनवेल आणि नागपूर मनपालाही मागे सोडले आहे. पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन तर्फे महानगर पालिकांचा ई गव्हर्नन्सचा सद्यस्थितीबाबत अभ्यास करुन हा निर्देशांक तयार केला आहे. मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी याबाबत सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे व संपूर्ण संगणक विभागाचे कौतूक केले आहे. नागरिकांना आवश्यक असलेल्या पारदर्शक सेवा या पुढे ही देण्याकरिता मनपा प्रयत्नरत राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ www.am rav ati corpora tion.in qH$dm www.e-varnan ce.poli cyresear ch.in येथे हा निर्देशांक सर्वांना 'बघता येईल तसेच डाऊनलोडही करता येईल. ग्रारीरींळ ेलळश्रश रीं मोठया प्रमाणात डाऊनलोड करावे व सर्व सेवांकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावे असे आवाहन मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

### मंत्री दादा भुसेंच्या ताफ्यावर तूर-कापूस फेकल्याचे प्रकरण

# पराग गुडधेंसह २५ पदाधिकाऱ्यां विरुध्द गुन्हा दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** जिल्हाधिकारी कार्यालय येथे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या ताफ्यासमोर आंदोलन करणाऱ्या शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पराग गुडधेंसह २५ पदाधिकाऱ्यांविरुध्द गाडगेनगर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. शिक्षणमंत्री दादा भुसेयांचेगुरुवारी अमरावतीत आगमन झाले होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय येथे शिवसेना उबाठा गटाच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन केले. तूर, कापूस, सोयाबीनला भाव मिळावा या मागणीसाठी त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली आणि ना भुसे यांच्या ताफ्यावर तूर, कापूस फेकला. आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील लोखंडी गेट मधून जबरीने आत जाण्याचा प्रयत्न केला. यासरकारचे करायचे काय, खाली मुंडकं वरती पाय.... अशी घोषणाबाजी त्यांनी केली. या आंदोलनामुळे पोलिस प्रशासनाचा गोंधळ उडाला. गाडगेनगर पोलिसांनी याप्रकरणी पराग गुडधे यांच्यासह नरेश पडोळे, मनोज कडू, महेंद्र दिपटे अन्य २० ते २५ पदाधिकाऱ्यांविरुध्दकलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# अमरावतीत रंगणार मराठी शायरी आणि कवितांची अनोखी मैफल वाहवा!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती :** मराठी शायरी आणि कवितांच्या अनोख्या संगमाने रसिकांना मंत्रमुग्ध करणारी वाहवा! ही विशेष मैफल अमरावतीत रंगणार आहे. ज्ञानपथ प्रकाशनाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दिनांक १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:०० वाजता अभियंता भवन, शेगाव नाका येथे हा अनोखा साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आला आहे.मराठी भाषेला यंदा अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याचा आनंद सर्व मराठीप्रेमींना आहे. या ऐतिहासिक घटनेचा उत्सव साजरा करण्यासाठी ‘अभिजात मराठीचा उत्सव’ या संकल्पनेखाली ज्ञानपथ प्रकाशनाने हा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. या निमित्ताने मराठी शायरी आणि कवितांचा सुरेल मिलाफ रसिकांसमोर सादर केला जाणार आहे.

प्रकाशक सचिन सुकळकर यांनी माहिती देताना सांगितले की, मराठी कवितेची परंपरा फार समृद्ध आहे. या परंपरेतील काही अजरामर रचना तसेच समकालीन शायरी आणि कविता रसिकांसमोर आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. मराठी शायरीचा स्वतंत्र प्रवाह आहे, जो लोकांना फारसा परिचित नाही. त्यामुळे हा कार्यक्रम रसिकांसाठी एक आगळीवेगळी अनुभूती ठरेल.या मैफलीचे प्रमुख आकर्षण असतील लेखक आणि कवी ज्ञानेश्वर गटकर. त्यांनी विदर्भ प्रजासत्ताकशी संवाद साधताना सांगितले की, शायरी ही केवळ उर्दूची मक्तेदारी नाही. मराठीतही अप्रतिम शायरी लिहिली गेली आहे. तिच्यात प्रेम, विरह, जीवनानुभव, समाजभान आणि तत्त्वज्ञानाचा अनोखा संगम असतो. हा कार्यक्रम म्हणजे रसिकांना मराठीतील काही अपरिचित



आणि सुप्रसिद्ध शायरी-कविता ऐकण्याची सुवर्णसंधी असेल.या कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध सूत्रसंचालक सूरज हेरे सांभाळणार असून, त्यांच्या ओघवत्या शैलीत रसिकांना साहित्याचा हा आनंद अधिक प्रभावीपणे अनुभवता येईल.अमरावतीतील साहित्य व कविता प्रेमींसाठी हा कार्यक्रम नक्कीच अविस्मरणीय ठरेल. मराठी काव्य परंपरेचा उत्सव साजरा करण्यासाठी आणि अभिजात मराठीच्या या सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी सर्व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे

# सोयाबीन खरेदी रखडल्याने शेतकरी धडकले तहसील कार्यालयात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ धामणगाव रेल्वे**

शासनाच्या नाफेड खरेदी केंद्राचे पोर्टल गुरुवारी (दि.६) रात्री १२ वाजता बंद झाले. त्यामुळे खरेदी न झाल्याने केंद्राबाहेर सोयाबीनच्या माल घेऊन आलेल्या ३५ गाड्या रखडल्या. नाफेडकडून खरेदी होत नसल्याचे पाहून संतप्त शेतकऱ्यांनी बेट तहसील कार्यालय गाठले. आमचा माल घ्या अन्यथा आम्ही हटणार नाही, असा पवित्रा घेऊन तहसीलदार अभय यांच्याकडे तक्रार नोंदविली.नाफेड खरेदीच्या शेवटच्या टप्प्यात दोन दिवसांपूर्वीपासून तालुक्यातील मंगरुळ दस्तगीर, तळेगाव, देवगाव, हिरपूर तळणी, निंबोरा राज, उसळगव्हाण या भागातील २८ शेतकरी शासकीय सोयाबिन खरेदी केंद्रावर आपला माल विक्रीसाठी तात्कळत बसले होते. काहींनी बैलबंडी, टाटा एस तर काहींनी इतर वाहनांमधून सोयाबिन विक्री करिता आणलेहोते. बाजार समिती प्रशासनाने टोकनही दिले. मात्र बुधवारी रात्री १२ वाजता पोर्टल बंद होणार असताना सायंकाळी ६



वाजेपासून शासकीय खरेदी बंद केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. यावेळी खरेदी विक्री सोसायटीच्या माध्यमातून नाफेडेची खरेदी सुरु असल्याने अधिकाऱ्यांनी मात्र ११.२२ वाजतापर्यंत खरेदी सुरु असल्याचा दावा केला आहे. प्रत्येक्षात आपले सोयाबीन खरेदी करण्यात आले नाही, असा आरोप करीत संतप्त शेतकरी तहसील कार्यालयात धडकले. तहसीलदार घोरपडे यांनीसुध्दा डिएमओ यांच्याशी संपर्क करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. परंतु शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागले नाही.याबाबत शासनाचा पुढील आदेश येईस्तोवर नाईलाजाने काहीच करु शकत नाही, असे दत्तापूर खरेदी विक्रीचे मारोती बोकडे यांनी सांगितले आहे.

# तरुणांनी आपल्या जीवनाचे नियोजन करावे - डॉ अभय जेरे

## प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च,बडनेरा येथे सांस्कृतिक महोत्सव आशाएँ २०२५ उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती –** स्थानिक विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित प्रा.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेराच्या आशाएँ २०२५ या सांस्कृतिक महोत्सव नुकतेच थाटात साजरा झाला. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून -खउढए, नवी दिल्ली चे उपाध्यक्ष माननीय डॉ. अभय जेरे व उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष माननीय डॉ. नितीनजी धांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या प्रारंभी दीप प्रज्वलन व सरस्वती देवीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. आर. बमनोटे व आशाएँ २०२५ चे समन्वयक डॉ. निकु खालसा आदींची प्रमुख उपस्थिती लाभली.उपस्थित मान्यवरांचे स्वागत सहसमन्वयक प्रा.आनंद चौधरी व प्रा.आशिष कडू व आयोजन समितीचे सदस्य







डॉ. मैथिली देशमुख, प्रा.सौरभ परोपटे, प्रा.ऋतुजा अढाउ, प्रा.प्रीती लवाळे, डॉ.योगिता अलोने, डॉ.अनुप कडू, डॉ.करण बेलसरे, प्रा.समृद्धी तायडे, प्रा.मीनल निस्ताने, प्रा.आशिष कराळे, यांनी वृक्षरोप प्रदान करून केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आशाएँ २०२५ चे समन्वयक डॉ. निकु खालसा यांनी मांडले तर प्रा. डॉ. जी. आर. बमनोटे यांनी कार्यक्रमाची भूमिका विशद केली. प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना पुरस्कार व सन्मानचिन्ह प्रदान करून सत्कार केला. याप्रसंगी डॉ. अभय जेरे यांनी तुम्हाला जीवनात काय साध्य करायचे आहे याची दूरदृष्टी आणि सहाय्यक योजना असणे आवश्यक आहे जर तुम्हाला कधी योग्य स्थळी पोहोचायचे असल्याचे विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रा.आनंद चौधरी यांनी मांडले.तर विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी चे अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष अँड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव श्री. युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य श्री. नितीन हिवसे, डॉ.सौ.पूनम चौधरी, प्रा. विनय गोहाड, श्री. पंकज देशमुख व प्रा. गजानन काळे यांनी कार्यक्रमाच्या सफल आयोजना करिता शुभेच्छा व्यक्त केल्या.

विदर्भ प्रजासत्ताक

# आगामी पाच वर्षात गडचिरोली हे भारताचे स्टील हब होईल : - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

## डावोस गुंतवणूकीतील सुमारे ५ लाख कोटींचे करार विदर्भासाठी- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर-**
गडचिरोलीतील लोह खनिज देशातील उच्च दर्जाचे असून त्यावर प्रक्रिया उद्योग येत असून येत्या पाच वर्षात देशातील स्टील हब म्हणून उदयास येईल असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या अमरावती रोड स्थित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरा मध्ये आयोजित एडवांटेज विदर्भ २०२५- खासदार औद्योगिक महोत्सव या तीन दिवसीय औद्योगिक प्रदर्शनीच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत त्याचप्रमाणे विदर्भातील खासदार, लोकप्रतिनिधी आणि देशातील उद्योजक उपस्थित होते. लॉयड्स मेटल सारख्या उद्योग समूहांनी गडचिरोली मध्ये उद्योग उभारल्याने येथील नक्षलवाद्याचा प्रश्न बऱ्याच अंशी सुटला असून युवक आता रोजगाराच्या माध्यमातून समाजाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत असे गडकरी यांनी यावेळी स्पष्ट केले. नागपूर मध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर तसेच अजनी येथील रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास ,





२४०० कोटी रुपयांचा लॉजिस्टिक पार्क ,कार्गो हब, मदर डेअरीचा प्रकल्प अशा विविध विकास प्रकल्पामुळे विदर्भाचा विकास देवेंद्र फडणवीस यांच्या साह्यामुळे दुपटीने होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला . रायपूर ते विशाखापट्टणम ३६ हजार कोटींचा एक्सप्रेस हायवे आपण तयार करत असल्याचे सांगून गडचिरोली जिल्ह्यातून थेट रायपुर - विशाखापट्टणम एक्सप्रेस हायवेला जोडून आपण माल निर्यात करू शकाल आणि गरज भासल्यास काकीनाडाला देखील घेऊन जाऊ म्हणजे मुंबईला जाण्याची गरज न पडता दळणवळणाचे खर्च कमी होतील आणि जगभरात इथून निर्यात होईल असेही गडकरी म्हणाले.

डॉवोस जागतिक व्यापार परिषदेच्या दौऱ्याच्या माध्यमातून ५ लाख कोटी रुपयाचे सामंजस्य करार विदर्भासाठी करण्यात आले असून स्टील , इलेक्ट्रॉनिक व्हेईकल , सोलर बॅटरी , नवीकरणीय ऊर्जा अशा विविध क्षेत्रातील उद्योग विदर्भात स्थापन होणा असून विदर्भाचा विकास झपाटाने होत असल्याच प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात बोलताना केले .अमरावती मध्ये टेक्स्टाईल झोन विकसित झाला असून केंद्र सरकारच्या 'पीएम मित्रा' पार्कच्या माध्यमातून येथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ मिळत आहे अमरावतीत 'कॉटन टू फॅशन' अशी एक परिसंस्था तयार झाली असल्याचे देखील त्यांनी सांगितलं .विदर्भात एक नवीन इंडस्ट्रियल मॅग्नेट तयार होत असून मोठ्या प्रमाणात उद्योग विदर्भात येऊन या क्षेत्रात रोजगार गुंतवणूक आणि समृद्धी निर्माण होईल असा देखील विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक या प्रदर्शनाचे आयोजक आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे, यांनी तर आभारप्रदर्शन सचिव डॉ. विजय कुमार शर्मा यांनी केले.

# मालमत्ता कर भरणासाठी सुटीच्या दिवशी पाचही झोन कार्यालय राहणार सुरु

## पाचही झोन कार्यालयामध्ये सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कर शिबिराचे आयोजन

**नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे मनपा कडून आवाहन**

विदर्भ प्रजासत्ताक
दि.८ अमरावती - शहरातील नागरिकांना मालमत्ता कर भरता यावी, याकरीता महानगरपालिकेचे पाचही झोनमध्ये सुटीच्या दिवशी (शनिवारी व रविवारी) मालमत्ता कर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी मालमत्ता कर भरून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

शहरातील मालमत्ता धारकांकडे मालमत्ता कर थकीत आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना सुखसुविधा पुरवितांना मनपाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. म्हणून नागरिकांनी तातडीने थकीत कर व चालू वर्षाचा कर भरून महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मनपा प्रशासनाच्या वतीने आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे. तसेच शनिवारी व रविवारी शासकीय सुटी असतांना देखील त्या दिवशी नागरिकांना कर भरता यावा याकरीता शनिवार व रविवार रोजी महानगरपालिकेच्या पाचही झोनमध्ये मालमत्ता कर शिबिर



आयोजीत करण्यात आले आहे.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर ऑनलाईन भरण्याकरिता महानगरपालिकेची do~gmB©Q> www.amravaticorporation.in VWm www.amravatimc.in व amravatimc.org या संकेतस्थळावर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मालमत्ता कर धारकांना मालमत्ता कर भरणा करण्याबाबत कोणतीही तक्रार व मदत लागल्यास कृपया उत्तर झोन क्र.१, रामपुरी कॅम्प संपर्क क्र.८७६७५५५१०२, मध्य झोन क्र.२, राजापेठ संपर्क क्र.७०३०९२२९१२, पुर्व झोन क्र.३, दस्तुरनगर संपर्क क्र.९४२२६६६७४३, दक्षिण झोन क्र.४, बडनेरा संपर्क क्र.९७६३९७२७१७, पश्चिम झोन क्र.५, भाजीबाजार संपर्क क्र.९३२५६७२५२० यांच्याशी संपर्क साधावा.

# विभागीय आयुक्तांनी घेतला महसूल विभागाचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अकोला-**
कार्यालयात दाखल अर्ज, प्रकरणे प्रलंबित ठेवू नयेत. ती वेळोवेळी निकाली काढावीत, तसेच उपविभागीय स्तरावर त्याचा रोज आढावा घ्यावा. शासनाच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी दिले.विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल यंत्रणेचा आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्यासह अतिरिक्त जिल्हाधिकारी रामदास सिद्धभट्टी, उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.



विभागीय आयुक्त श्रीमती सिंघल म्हणाल्या की, महसूल यंत्रणेत दाखल प्रकरणांचा नियमित आढावा घेऊन ती प्रलंबित राहणार नाहीत याची काळजी घ्यावी. ई-फेरफारबाबत प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करावा. न्यायालयात दाखल प्रकरणे वगळता इतर कुठलेही प्रकरण प्रलंबित राहता कामा नये. अर्धन्यायिक प्रकरणे, विभागीय चौकशी याबाबत आवश्यक सुनावण्यांची प्रक्रिया पूर्ण करून ती विहित वेळेत निकाली काढावीत. शासनाचे लोकाभिमुख धोरण जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असे त्यांनी सांगितले.शेतकरी आत्महत्या प्रकरणांचा आढावा घेताना अशी प्रकरणे घडण्याची कारणे, परिसर, भौगोलिक व नैसर्गिक स्थिती अशा सगळ्या गोष्टींचा अभ्यास करावा. संबंधित कुटुंबाला योजनेतील आर्थिक मदतीबरोबरच इतरही विविध योजनांचे एकत्रित पाठबळ मिळवून द्यावे, असेही त्यांनी सांगितले. ग्रीस्टेक प्रणालीत शेतकरी नोंदणी होत आहे. त्याचीही माहिती विभागीय आयुक्तांनी घेतली.सेवाज्येष्ठता यादी, बिंदूनामावली, आश्वासित प्रगती योजना, अनुकंपा पदभरती आदी आस्थापनाविषयक बाबी, ई-चावडी, वाळू डेपो, अकोल्यासाठी अपर तहसील कार्यालय प्रस्ताव, जमीन महसूल, गौण खनिज वसुली, आपले सरकार पोर्टल आदी विविध बाबींचा आढावा विभागीय आयुक्तांनी घेतला.जिल्हा वार्षिक योजनेतील वैशिष्ट्यपूर्ण कामे, महाराजस्व अभियान, कृषी वसंत अभियान, वनपर्यटन आदींबाबत जिल्हाधिका-यांनी सादरीकरण केले.

सीएससी सेंटरची पाहणी

ग्रीस्टेक प्रणालीत शेतकरी नोंदणी होत आहे. सीएससी सेंटरच्या माध्यमातून ही प्रक्रिया होत आहे. या प्रक्रियेद्वारे प्रत्यक्ष नोंदणी कशी केली जाते, याची पाहणी करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी पंचायत समिती आवारातील सीएससी सेंटरला भेट दिली व प्रत्यक्ष प्रक्रियेचे अवलोकन केले. त्यानंतर जिल्हा परिषदेतील योजनांचाही त्यांनी आढावा घेतला.

# लाडकी बहीण योजनेला पुन्हा खेचले कोर्टात; महायुतीचे टेन्शन वाढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई-** लाडकी बहीण योजना योजनेवरून रोज वादविवाद सुरू आहेत. निवडणुकीपूर्वी सरसकट लाभ दिल्यानंतर आता अनेक निकष लावले जात आहेत. सुमारे पाच लाख लाभार्थ्यांची नावे यातून वगळण्यात आली असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे विरोधकांच्यावतीने महायुती सरकाराला धारेवर धरले जात असताना नागपूरच्या उच्च न्यायालयात या योजनेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर पुन्हा नव्याने आक्षेप घेण्यात आला आहे.

अनिल वडपल्लीवार यांनी उच्च न्यायलयात सर्व प्रथम जनहित याचिका दाखल केली होती. त्यावरून बरेच राजकारण झाले होते. भाजपच्यावतीने लाडक्या बहिणींना लाभ मिळू नये असे प्रयत्न काँग्रेसच्यावतीने केले जात असल्याचा आरोप केला. माजी मंत्री सुनील केदार यांच्या सांगण्यावर वडपल्लीवार यांनी याचिका दाखल केल्याचेही सांगण्यात आले होते.लाडकी बहीण योजना राजकीय फायद्यासाठी नव्हे तर गरीब महिलांच्या उन्नतीसाठी सुरू करण्यात आली असल्याचे राज्य शासनाच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले होते. इतर योजना प्रभावित होणार नाही, असा दावा करून लाडक्या बहिणीला पैसे देण्यासाठी उत्पन्नाची वेगळी



तरतूद केली असल्याचेही जाहीर भाषणांमधून महायुतीच्या नेत्यांनी सांगितले होते.

हे सर्व खोटे असून यावर वडपल्लीवार यांनी लाडकी बहीण योजनेमुळे शेतकऱ्यांच्या अनुदानात विलंब होत आहे, आरोग्य सेवा, शालेय व पायाभूत सुविधा एवढेच नव्हे तर रोजगाराच्या योजना राज्य शासन पूर्ण करीत नसल्याचा दावा शपथपत्राद्वारे केला आहे.

या प्रकरणावर न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या समक्ष सुनावणी झाली. शासनाच्या या अनाठायी खर्चामुळे पायाभूत सुविधा, प्रकल्प रखडले आहेत. सामाजिक कल्याणाचे उपक्रम कोलमडले आहेत. सरकारवर आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज असूनही राज्याने थेट रोख हस्तांतरण आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित खर्चासाठी निधी वाटप करणे सुरूच ठेवले असल्याचे या शपथपत्रात याचिकाकर्त्यांने नमूद केले आहे.

# नागपूर विणकर सेवा केंद्राद्वारे ७ दिवसीय विशेष हातमाग प्रदर्शनाचे ८ ते २५ फेब्रुवारी दरम्यान

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर-** केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या हातमाग विकास आयुक्त कार्यालया अंतर्गत विणकर सेवा केंद्राद्वारे एक विशेष हातमाग प्रदर्शन ८ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान नागपूरच्या सिव्हिल लाईन्स येथील दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या परिसरात आयोजित करण्यात आले आहे . या प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ८ फेब्रुवारी शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे आयुक्त संजय दैने याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. देशाच्या विविध भागातील ५० हातमाग विणकर,सहकारी संस्था,हातमाग महामंडळे,उत्पादक कंपन्या,हस्तकला कारागीर या प्रदर्शनात सहभागी होऊन त्यांची उत्पादने प्रदर्शित करणार असून या वस्तूंची विक्री देखील




या दालना मध्ये होणार आहे . खरेदीदारांना बनारसी, बालूचरी, पैठणी, तुसार, कोटा डोरिया, चंदेरी, माहेश्वरी, गडवाल या प्रकारच्या हातमाग साड्या आणि ड्रेस मटेरियल थेट विणकर आणि कारागिरांकडून खरेदी करण्याची संधी मिळणार असून हे प्रदर्शन ८ ते १४ फेब्रुवारी दरम्यान दुपारी १ रात्री ९ वाजेपर्यंत खुले राहील. या सात दिवसीयया विशेष हातमाग प्रदर्शनादरम्यान, भरतनाट्यम नृत्य, कथ्थक नृत्य, सुगम संगीत, फॅशन शो, खरेदीदार विक्रेता बैठक, हातमाग विणकामाचे थेट प्रात्यक्षिक, कापडाची छपाई आणि रंगवणे इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन मनोरंजनासाठी आणि जागरूकतेसाठी आयोजित केले जाणार आहेत पारंपारिक पाककृतींचा आस्वाद घेण्यासाठी वेगवेगळे खाद्य स्टॉल देखील या प्रदर्शनात उपलब्ध असतील. या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन विणकर सेवा केंद्र नागपूरचे कार्यालय प्रमुख आणि उपसंचालक एस पी ठुबरीकर यांनी केले आहे.

# उद्योगासाठी कर्ज हवे , फ़क्त १० टक्के भरा

## मार्जिन मनी योजनेतुन बेरोजगारांना लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**
बेरोजगारांच्या हाताला काम मिळावे यासाठी केंद्र शासनाच्या वतीने स्टॅण्ड अप योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील लाभार्थ्यांसाठी 'मार्जिन मनी' योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत लाभासाठी अनेक जण सामाजिक न्याय त विशेष साहाय्य विभागाकडे अर्ज करतात. परंतु, बँकांकडून कर्ज प्रस्ताव मंजूर होत नसल्याने उद्योग उभारणीसाठी युवकांना साहाय्य मिळत नाही.

मार्जिन मनी योजनेअंतर्गत एकूण प्रकल्पाच्या २५ टक्के हिस्सा हा लाभार्थ्याला भरावा लागतो. त्यानंतर उर्वरित रक्कम बँकेमार्फत लाभार्थ्याला उद्योग उभारण्यासाठी दिली जाते. मात्र, महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील लाभार्थ्याची २५ टक्के रक्कम भरण्याची आर्थिक क्षमता नसल्याने सामाजिक न्याय विभागामार्फत २५ टक्क्यांपैकी १५ टक्के रक्कम मार्जिन मनी म्हणून देण्यात येते.मागील काही वर्षामध्ये मोठ्या संख्येने बेरोजगारी वाढली आहे. त्यामुळे बेरोजागरांच्या हाताला काम देण्यासाठी विविध उद्योगधंद्याच्या उभारणे गरजेचे आहे. या योजनेच्या माध्यमातून




बेरोजगार युवकांना उद्योग उभारणीसाठी कर्ज पुरवठा केला जातो.

**काय आहे शासनाची मार्जिन मनी योजना?**

केंद्र सरकारच्या स्टॅण्ड अप इंडिया योजनेअंतर्गत उद्योग सुरू करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजकांना भराव्या लागणाऱ्या २५ टक्के हिश्शाच्या रकमेपैकी १५ टक्के रक्कम सामाजिक न्याय विभागामार्फत मार्जिन मनी म्हणून देण्यात येते.

**नवीन अर्ज मागविले**

मार्जिन मनी योजनेचा लाभदेण्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत. त्यामुळे इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यांना योजना राबविली जाते. यासाठी प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जाते. मात्र योजना मिळत असली तरी विविध कागदपत्र आणि बँकेकडून कर्ज प्रकरणे मंजूर होत नसल्याने अनेकजण दुर्लक्ष करताताराज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. यासाठी त्यांच्याकडून अर्ज मागविली जाते. छाननी नंतर अर्ज मंजूर केले जातात.

**काय आहेत निकष?**

१. अर्जदार हा अनुसूचित जाती, नवबौद्ध घटकातील असावा, तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२. वय १८ ते ५० वर्षे असावे उत्पन्न मर्यादा ग्रामीण भागासाठी ९८ हजार रुपये तर शहरी भागासाठी १ लाख २० हजार रुपये आहे.

३. अर्जदाराकडे आधारकार्ड, शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उत्पन्न दाखलाही गरजेचा आहे.

**बँकांकडून फेटाळले जातात लाभार्थ्यांचे प्रस्ताव**

२५ टक्के सबसिडी मार्जिन मनी योजनेअंतर्गत दिली जाते. परंतु, काही

बँकांकडून कर्ज प्रकरणे मंजूर केली जात नाहीत. त्यामुळे अर्जाला मंजुरी मिळूनही अनेकवेळा लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित राहण्याची वेळ येते.

# ३५ वर्षे जुनी इमारत होणार जमीनदोस्त : धामणगाव गढी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारती करता शासनाकडून निधी मंजूर - निलेश फाटकर यांच्या उपोषणाचे यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ८ परतवाडा**

ग्रामीण आरोग्याची मदार असलेल्या जिल्ह्यातील बहुतेक प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था अत्यंत वाईट ज्यामध्ये अचलपूर तालुक्यातील धामणगाव गढी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा सामावेश आहे ही इमारत धोकादायक झाल्याने नवीन इमारत बांधण्यासाठी मंजुरात द्यावी अशी मागणी निलेश फाटकर यांनी सातत्याने लावून धरून त्यासाठी मागील काही दिवसापूर्वी उपोषण सुद्धा केले होते. जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व मुख्य कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद



अमरावती यांनी सुद्धा या उपोषणाची गंभीर दखल घेत शासनाकडे पत्रव्यवहार करून नवीन इमारतीच्या बांधकामाकरिता निधी मंजूर करून घेतला. आता धामणगाव गढी येथे सुसज्ज असे प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत काही दिवसात तयार होईल.महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात मोठे आरोग्य केंद्र म्हणून धामणगाव गढीचे नाव घेतल्या जाते आज त्याच प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झाली आहे या इमारतीला तब्बल ३५ वर्ष झाली ज्यामुळे इमारतीच्या काही अत्यंत शिकस्त झाला आहे परिणामी येथील कर्मचाऱ्यांना जीव मुठीत सेवा द्यावी लागत आहे त्याशीवाय रुग्णांच्या जीवलाही धोका निर्माण झाला आहे या आरोग्य केंद्रावर जवळपास ४५ गावांचा डोलारा आहे सोबतच मेळघाट लागून असल्याने पाच सहा गावातील रुग्ण येथे उपचारासाठी दाखल होतात त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी शासनाने ही इमारत पाडून नव्याने इमारत बांधण्याची मागणी धामणगाव गढी येथील निलेश फाटकर यांनी केली होती त्याच अनुषंगाने सीईओ संचिता मोहपात्रा यांनी आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी सुद्धा केली होती. आणि त्यांनी त्या क्षणी आश्वासन सुद्धा दिले होते. नवीन वर्षात या इमारतीचे बांधकाम करू आणि त्या इमारतीच्या बांधकामाकरिता मंजूर देऊन त्यांनी आपल्या आश्वासन पूर्ण केले.

**गावकऱ्यांसाठी आनंदाची बातमी – निलेश फाटकर**

धामणगाव गढी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत अतिशय शिकस्त झाली होती. त्या इमारतीत कर्मचारी सुद्धा आपला जीव मुठीत धरून काम करीत असायचे जुने बांधकाम असल्यामुळे रुग्णांनाही गैरसोय व्हायची आता नवीन इमारतीमुळे नागरिकांना अजून चांगली आरोग्य सेवा पुरवल्या जाईल हे गावकऱ्यांसाठी आनंदाची बाब आहे.

# आम्ही रांगेतच अन् खरेदीची मुदत संपली, राज्यातील २.६६ लाख शेतकऱ्यांकडील सोयाबीनचे मोजमाप शिल्लक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

राज्य सरकारने शेवटच्या दाण्यापर्यंत म्हणजेच शेतकऱ्यांकडे असलेल्या १४ लाख १३ हजार टन सोयाबीन एमएसपी दराने खरेदी करण्याची घोषणा केली होती. ६ फेब्रुवारीला या खरेदीची मुदत संपली. १५ ऑक्टोबर २०२४ ते ६ फेब्रुवारी २०२५ या काळात राज्य सरकारकडून नाफेड व एनसीसीएफच्या माध्यमातून ५ लाख ११ हजार ६५७ नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून ११ लाख २१ हजार ३८५ टन सोयाबीनची खरेदी करण्यात आली आहे. असे असले तरी अद्यापही तब्बल २ लाख ६६ हजार १०० नोंदणीकृत शेतकऱ्यांकडील सोयाबीन खरेदी करण्यात आले नाही.

२०२४-२५ च्या हंगामात सोयाबीनचे दर एमएसपीपेक्षा किमान एक हजार रुपये कमी आहेत. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने नाफेड व एनसीसीएफच्या मदतीने राज्यात ५६२ खरेदी केंद्र सुरू केले. या केंद्रांवर एकूण ७ लाख ७७ हजार ७५७शेतकऱ्यांनी सोयाबीन विकण्यासाठी सरकारकडे नोंदणी केली. मात्र, अशातच खरेदीची मुदत संपल्याने शिल्लक राहिलेल्या सोयाबीनची खरेदी कधी होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.



## खरेदीचा वेग संथच

सोयाबीन खरेदीचा वेग सुरुवातीपासून आजवर अतिशय संथ राहिला. त्यातच ३१ डिसेंबर २०२४ ला खरेदीची मुदत संपली. त्यापूर्वीच बारदाना नसल्याचे कारण सांगून खरेदी बंद करण्यात आली. खरेदीला ३१ जानेवारी आणि नंतर ६ फेब्रुवारी अशी दोनदा मुदतवाढ देण्यात आली. या काळात खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण करणे गरजेचे असताना २.११ लाख टन सोयाबीन कमी खरेदी करण्यात आले. २ लाख ६६ हजार १०० शेतकऱ्यांकडील सोयाबीनचे मोजमाप शिल्लक असताना या खरेदीला मुदतवाढ मिळण्याची शक्यता खूपच कमी असल्याचे पणन मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# जिल्हा परिषदेतील पाच वर्षांपासून एकाच टेबलवर कार्यरत असलेल्यांची उचलबांगडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

जिल्हा परिषदेतील विविध विभागांत पाच वर्षांपासून एकाच विभागात काम करणाऱ्या विविध संवर्गातील ७९ कर्मचाऱ्यांच्या विभाग बदलाचे आदेश शुक्रवारी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी जारी केले आहेत. सीईओंच्या आदेशानुसार विस्तार अधिकारी सांख्यिकी पदावर कार्यरत असलेल्या एकाची बदली आरोग्य विभागातून डीआरडीएमध्ये करण्यात आली. वरिष्ठ सहायक लिपिक म्हणून कार्यरत असलेल्या बांधकाम, कृषी,सामान्य प्रशासन, पशुसंवर्धन आदी विभागांतील सहा कर्मचाऱ्यांचे विभाग बदलण्यात आले आहेत. यामध्ये काहींना अमरावती पंचायत समितीत आणि काहीजणांना मुख्यालयातील दुसऱ्या विभागात नियुक्ती दिली आहे. कनिष्ठ सहायक लिपिक संवर्गातील १२ जणांचे विभाग बदलण्यात आले आहेत. यामध्ये बांधकाम, मग्रारोहयो, माध्यमिक शाळा, पंचायत समिती आदींचा समावेश आहे.

# गॅबियन तंत्र वापरून नाल्यावरील भिंत सुरक्षित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती शहरात मनपातर्फे प्रथमच गॅबियन तंत्रांचा वापर करून पन्नालाल नगर येथील खचलेल्या अंबानाल्याची भिंत मजबूत करण्यात आली आहे. त्यामुळे आता या भिंतीलगत असलेला रस्ता व घरांना कोणताही धोका राहिला नाही. पन्नालाल नगरातून वाहणारा मोठा नाला सुरक्षा भिंती नसल्याने खचला होता. परिणामी नागरिकांचा येण्या-जाण्याचा पुलाजवळील पन्नालालनगर शॉर्टकट रस्ता बंद झाला होता. आता नाल्याला गॅबियन तंत्राने सुरक्षा भिंत बांधण्यात आल्याने नाला खचण्याचा धोका राहिला नाही. त्यामुळे येणे-जाणे करण्याचा शॉर्टकट मार्गही सुरक्षित झाला आहे. यासाठी पुढाकार घेणारे मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांचे माजी स्थायी समिती सभापती मिलींद बांबल यांनी अभिनंदन केले आहे. या शॉर्टकट रस्त्यावर मोठी वर्दळ असते. हा रस्ता नाला खचल्यामुळे केव्हाही खाली पडून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. याबाबत जनतेच्या समस्या



सोडविण्यासाठी नेहमी तत्पर राहणारे नेतृत्व मिलींद बांबल यांनी एखादी मोठी दुर्घटना होण्याआधी नाल्याची दुरुस्ती झाली पाहिजे यासाठी सातत्याने प्रामाणिक प्रयत्न केले, निवेदनं दिले. नागरिकांच्या सुरक्षेसाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नाल्यात उतरून आक्रमक आंदोलनही त्यांनी केले होते. मनपाजवळ निधी उपलब्ध नसला तरी दुरुस्तीचे काम झालेच पाहिजे, या मागणीसाठी बांबल आक्रमक होते. म्हणून अमरावती महानगरपालिकेने प्रथमच प्रायोगिक तत्त्वावर स्थापत्य तंत्राचा वापर करून गॅबियन वॉल या तांत्रिक सुरक्षा भिंतीचे कमी किमतीत अंदाजपत्रक तयार करून भिंत बांधण्याचे काम सुरू केले. २० लाख होणारा खर्च आता ५ लाखावर पूर्ण १० मी. लांबीच्या भिंतीच्या बांधकामास अंदाजे २० लाख रुपये खर्च अपेक्षित असतो. तो गॅबियन तंत्राचा वापर करून उभारल्या जाणाऱ्या भिंतीमुळे १५ लाखाने कमी होऊन केवळ ५ लाखावर आला आहे. मनपानेही त्यांच्या निधीतून प्रायोगिक तत्त्वावर या तंत्राचा वापर करून पन्नालाल नगर नाल्याला भिंत मंजूर केली. यात मोठे मजबूत चौरस, आयाताकृती दगड, लोखंडी जाळ्यांची आवश्यकता असते.

# चांदुर रेल्वेतील डॉ. आंबेडकर वसतीगृहातील गृहपाल स्वतःची गाडी धुवायला लावतात

## गाडी धुण्यास नकार दिल्याने सुडात्मक भावनेतून केली बदली : कंत्राटी कर्मचारी गणेश मेडे यांचा पत्रकार परिषदेतून आरोप : चांदूर रेल्वे वसतीगृह येथे नियुक्ती न दिल्यास आत्मदहनाचा इशारा : गृहपाल हे सुपरवायझरला हाताशी धरून देत आहे मानसिक त्रास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलाचे वसतीगृह येथे गणेश मेडे कंत्राटी माळी म्हणून मागील दीड वर्षांपासून काम करीत आहे. असे असतांना कोणतीही तक्रार नसतांना आता नवीन आलेले गृहपाल हे कंत्राटी कामगारांना स्वतःची गाडी धुवायला लावतात. गाडी धुण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून त्यांनी व स्मार्ट सर्विसेस कंपनीचे सुपरवायझर यांना हाताशी धरून सतत मानसिक त्रास देतात आणि खोट्या तक्रारी कंपनीकडे करून माझी बदली शासकीय वसतीगृह बोडणा अमरावती केली असा आरोप कंत्राटी कर्मचारी गणेश मेडे यांनी स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेतून केला.



दीड वर्षापूर्वी गणेश मेडे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतीगृह येथे कामाला लागले. त्यावेळी गृहपाल श्री. यादव होते. मात्र त्यांची दीड वर्षात कोणतीही तक्रार नव्हती. मात्र आता निलेश वाडेकर हे गृहपाल म्हणून चांदूर रेल्वे रूजू होवून काम हाती घेतले. त्यानंतर ते स्वतःची कार धुवायला लावत असल्याचा आरोप गणेश मेडे यांनी केला. त्यांनी पुढे सांगितले की, एक दिवस वसतीगृह परीसराची स्वच्छता केल्यानंतर कार धुतो असे बोललो. त्याचा राग मनात धरून त्यांनी गृहपाल पदाचा फायदा घेवून माझी तक्रार सतत स्मार्ट सर्विसेस कंपनीच्या व्यवस्थापकाकडे केली. त्यांचा वर्गमित्र स्मार्ट सर्विसेस सुपरवायझर विलास मोटघरे यांना बोलावून घेतले असुन ते दोघे मला मानसिक त्रास देतात. ऐवढेच नव्हे तर सुडात्मक भावनेतून माझी बदली शासकीय वसतीगृह, निंबोरा येथे करण्यात आली आहे. मला केवळ ७ हजार ५०० रूपये पगार मिळतो. त्यामध्ये चांदूर रेल्वे वरून निंबोरा ये-जा करणं व कुटूंब चालविणं अशक्य झाल्याने माझ्या कुटूंबावर उपासमारीची पाळी आली आहे असे गणेश मेडे यांनी म्हटले. या विषयी सामाजिक न्याय मंत्री, समाज कल्याण आयुक्त सुनिल वारे, समाज कल्याण अधिकारी जाधवर यांना लेखी निवेदन दिले आहे. मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे दोन महिण्याचा पगार आणि चांदूर रेल्वे वसतीगृह येथे नियुक्ती देण्यात यावी. असे न केल्यास मी आत्मदहन करणार याला वरीष्ठ शासकीय समाज कल्याण अधिकारी जबाबदार राहणार असा इशारा गणेश मेडे यांनी दिला आहे.

### कामच करीत नसल्याने कंपनीकडे तक्रार

स्मार्ट सर्विसेस कंपनीच्या वतीने गणेश मेडे कंत्राटी कर्मचारी म्हणून कामाला आहे. परंतु ते कोणतेही काम न करीत नाही, कामावर उशीरा येतात, अरेरावीने वागतात व मुजोरी करतात. कामच करीत नसल्याने त्यांची तक्रार कंपनीकडे केली. यापूर्वी ते तुळजापूर निवासी शाळेत कामाला होते. तिथेही त्यांचे वागणं चांगलं नसल्यामुळेच त्याला कामावरून काढले. उपोषणाला बसल्यानंतर कंपनीने त्याची नियुक्ती शासकीय मुलांचे वसतीगृहात केली. आताही त्याची बदली कंपनीने केली आहे.

**निलेश वाडेकरगृहपाल,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतीगृह,चांदूर रेल्वे**

### वरीष्ठांशी अरेरावीने व मुजोरीने वागतात

गणेश मेडे यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहे. ते काम करीत नाही व कामात सतत हलगर्जीपणा करतात. तसेच वरीष्ठांशी अरेरावीने व मुजोरीने वागतात. त्यामुळे कंपनीने त्यांची बदली केली. माझ्याकडे तीन तालुक्याचा प्रभार असुन एकुण ५४ कर्मचारी कार्यरत असुन त्यांच्या कोणत्याही तक्रारी नाहीत.

**विलास मोटघरेसुपरवायझरस्मार्ट सर्विसेस कंपनी**

# आ. सुलभा खोडके यांची माता रमाईंना मानवंदना : तपोवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेचे भूमिपूजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

प्रत्येक यशस्वी पुरुषामध्ये एका स्त्रीचा फार मोठा हात असतो याचा आदर्श त्यागमूर्ती माता रमाईंनी घालून दिला. डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजसेवेत व्यस्त असतांना रमाईने कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळून एक आदर्श पत्नी व आदर्श माता काय असते हे जगाला दाखविले. त्यांनी मुलांना चांगले संस्कार दिले, कुटुंबाला आर्थिक स्थैर्य दिले. बाबासाहेबांच्या कार्याला पुढे नेण्यासाठी रमाईने स्वतःचे जीवन



समर्पित करून एक आदर्श निर्माण केला. मातोश्री रमाई महिला मंडळ व लुंबीनी बुद्ध विहार तपोवन परिसर येथे मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी माजी नगरसेवक भूषण बनसोड, समाजसेवक राजू खोरगडे, मोहन क्षीरसागर, हिरामनजी गावंडे, राजूभाऊ ढोणे, प्रतिष्ठित गणमान्यवर आदीसह स्थानिक नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून मानवंदना अर्पण करण्यात आली. दरम्यान स्थानिक उपासिका-उपासक बांधवानी आ.सौ. सुलभाताई खोडके यांचे स्वागत केले. तसेच सदर भागात साकारण्यात येणाऱ्या ज्ञानप्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकीचे भूमिपूजन देखील आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्या हस्ते करण्यात आले. त्याच बरोबर स्थानिक भागातील पायाभूत सुविधांच्या कामाचे भूमिपूजन आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार महोदयांनी कुदळ मारीत व नामफलकाचे अनावरण करून भूमीपूजनाची औपचारिता साधली उदघाटन पुढे बोलतांना आमदार सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या की प्रेरणादायी व्यक्तिमत्व असलेल्या रमाबाईंनी सुख-दुःखाची कधीही पर्वा न करता स्वतःच्या संघर्षमय जीवनात किती अडचणींचा सामना केला. हे सांगता येत नाही. अर्थात अनेक अडचणींवर मात करून त्या त्यागमय व संघर्षमय जीवन जगत राहिल्या. कार्यक्रमाला मातोश्री रमाई महिला मंडळ व लुंबीनी बुद्ध विहार तलुंबिनी दिपजया कॉलनी तपोवन परिसरातील नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

# लॉटरी विक्रेत्यांची दिवाळी!बेकारीचे संकट टळले ;लॉटरीला हिरवा कंदील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ८ मुंबई**

लाखो लॉटरी विक्रेत्यांना हादरुन सोडणाऱ्या ऋलॉटरी बंदीचा निर्णय फिरविण्यात आला असून लॉटरीला सरकारने हिरवा कंदील दिला आहे या निर्णयाचा जल्लोष विक्रेते करीत आहेत ही तर दिवाळी पूर्वीची दिवाळी असल्याचा आनंद विक्रेते व्यक्त करीत आहेत.महाराष्ट्र राज्य लॉटरी तोटयात आहे म्हणून मार्च २०२५ नंतर छपाईचे काम थांबविण्यात आले होते त्यामुळे लाखों विक्रेते व त्यांचे कुटुंबिय यांच्यावर बेरोजगारीची टांगती तलवार होती. अखेर विक्रेत्या



संघटनेने केलेल्या पध्दतशीर आंदोलनामुळे सरकारला लॉटरी बंदीचा निर्णय रद्द करावा लागला.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, शिवसेना नेते श्री उध्दवजी ठाकरे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते, अंबादास दानवे यांची भेट घेऊन संघटनेने लॉटरी वाचविण्यासाठी मागणी केली. प्रशासनाने सोयीचा अर्थ लावून आकडे फुगविले आहेत हे आकडेवारीच्या आधारे मांडले होते. दादर येथे लॉटरी विक्रेत्यांचा लॉटरी बचाव मेळावा तसेच पत्रकार परिषदा यातूनही सरकारचे लक्ष हे वेधण्यात आले होते. लॉटरीची छपाई ही परराज्यात होते त्यामुळे तिकिटे विलंबाने मिळतात.

# घर,प्लॉट वर १एप्रिल पासून लागणार १० टक्के रेडिरेकनरचे दर : मुद्रांक शुल्कातही होणार वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

राज्य सरकारने १ एप्रिल पासूनरेडिरेकनर दरात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. कोणत्याही मालमतेची म्हणजेच प्रॉपर्टीची ठरविण्यात आलेली मूळ किंमत म्हणजेच रेडिरेकनर दर होय. हे दर आता वाढविले जाणार असल्यामुळे घर, प्लॉट अथवा इतर मालमत्ता खरेदी करावयाच्या विचारात असाल तर एप्रिलपूर्वी व्यवहार केल्यास फायद्याचे ठरू शकते.

रेडिरेकनर हे घराच्या, जमिनीच्या किंवा व्यावसायिक वापरासाठीच्या जागांचे प्रमाण दर असतात. हे दर तिथल्या परिसरानुसार आणि राहणीमानानुसार वेगवेगळे असतात. अर्थव्यवस्था, मागणी व पुरवठा यांची स्थिती पाहून दर ठरविले जातात. राज्य सरकारने ठरवून दिलेल्या रेडिरेकनर दरापेक्षा कमी दरात घर, जमीन व इतर मालमत्ता खरेदी केली तरी सरकारी दरानुसारच नोंदणी शुल्क आकारले जाते. त्याशिवाय आपला दस्त रजिस्टर होत नाही. त्यामुळे नियमानुसारच खरेदी करण्याची गरज असते.रेडिरेकनरचे दर वाढल्यास मालमत्ता खरेदी करताना मुद्रांक शुल्कासाठी अधिकचे पैसे मोजावे लागणार आहे. त्यामुळे घर खरेदी करण्याचे स्वप्न आणखी महागणार आहे.साधारणपणे आकारणी किंमत भागिले क्षेत्रफळ म्हणजेच रेडिरेकनर दर म्हटले जाते. सध्या ग्रामीण भागासाठी व्हॅल्युएशनच्या पाच टक्के, तर शहरी भागासाठी ६ टक्के रेडिरेकनरचा दर आकारला जात आहे.आपण जो प्लॉट विकत घेणार आहोत, त्या प्लॉटच्या किमतीत रेडिरेकनरनुसार जी वाढ होणार आहे, त्या किमतीत रेडिरेकनर दरानुसार साधारणतः १० टक्के वाढ अपेक्षित आहे.

एप्रिलआधी फायदा (बोल्ड करणे)दर वाढण्यापूर्वी म्हणजे एप्रिलआधी बुकिंग करून चलान भरल्यास रेडिरेकनरचे जुनेच दर लागेल. त्यासाठी चार महिन्यांच्या आत खरेदी-विक्री व्यवहार करणे आवश्यक आहे. एप्रिलनंतर वाढीव दर लागणार आहेत.

# शहरात टेक्सस स्मोक शॉप वर पोलिसांनी धाड

## ३ लाख रुपयांच्या प्रतिबंधित ई सिगरेट जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या टेक्सस स्मोक शॉप वर अमरावती शहर पोलिसांनी पथकाने धाड टाकून ३ लाख रुपयांच्या ई सिगरेट जप्त करण्यात आल्या.. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये खुलेआम पणे गेल्या अनेक दिवसांपासून याठिकाणीप्रतिबंधित असलेल्या इ सिगारेट विकल्या जात होती. तसेच या ठिकाणी अल्पवयीन मुलांचा मोठ्या प्रमाणावर वावर होता. यावेळी एकूण ३ लाख रुपये किंमतीची ५५ पॉकेट इ सिगरेट चे पॉकेट जप्त करण्यात आले आहे, ई-सिगारेटमध्ये निकोटीन व ऑरगॅनिक व्होलाटाईल सॉल्व्हट हे मानवी आरोग्यास अपायकारक घटक आहे,ई-सिगारेट ओढण्याचे प्रमाण तरुणांमध्ये वाढत असून त्यावर आळा घालण्यासाठी अनेक स्तरावरून कामे सुरू आहेत.

# दुर्योधनाचा अंत झाला... : केजरीवालांच्या पराभवावर कुमार विश्वास यांची प्रतिक्रिया



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

आपसाठी अस्तित्वाची लढाई तर भाजपची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाला आहे. यामध्ये 'आप'ला मोठा हादरला बसला असून तब्बल २७ वर्षांनंतर भाजपने दिल्ली विधानसभेवर भगवा फडकवला आहे. लक्षवेधी ठरलेल्या नवी दिल्ली मतदारसंघात माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला आहे. या मतदारसंघात भाजप उमेदवार प्रवेश वर्मा यांचा विजय झाला आहे. अरविंद केजरीवाल यांना ३ हजार १३८ मतांनी पराभव स्वीकारावा लागला आहे. या निकालावर बोलताना 'आप'चे माजी नेते, प्रसिद्ध कवी कुमार विश्वास यांनी दुर्योधनाचा अंत झाला..., अशा शब्दांमध्ये केजरीवालांवर हल्लाबोल केला.

कुमार विश्वास म्हणाले की, मी विजयाबद्दल भाजपचे अभिनंदन करतो. मला आशा आहे की ते दिल्लीच्या लोकांसाठी काम करतील. मला अशा माणसाबद्दल सहानुभूती नाही ज्याने आप पक्षाच्या कार्यकर्त्यांची स्वप्नभंग केली. दिल्ली आता त्याच्यापासून मुक्त झाली आहे. त्यांनी त्या स्वप्नांचा वापर त्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी केला. आज, न्याय मिळाला आहे. तसेच महाभारताचा संदर्भ देत त्यांनी दुर्योधनाने श्री कृष्णाला भर सभेत ललकारले होते, युद्ध केल्याशिवाय एक गावही देणार नाही त्या प्रकारे केजरीवालांना त्याच्या जागा जिंकण्यासाठी झगडावे लागत आहे. तसेच या दुर्योधनाचाही अंत झाला. त्यांना अन् त्यांच्या सहकाऱ्यांना दिल्लीची जनता एक खराब इतिहास म्हणून लक्षात ठेवतील असे म्हणत तिखट टिका केली आहे.

# आता चोरांची शटर गँग; आंतरराज्य 'शटर गँग' अकोल्यात जेरबंद; महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणामध्ये १७ गुन्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अकोला**

दुकानांचे 'शटर' तोडून मुद्देमालावर हात साफ करणाऱ्या आंतरराज्य कुख्यात टोळीला जेरबंद करण्यात अकोला स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांना यश आले आहे. या टोळीने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह कर्नाटक व तेलंगणामध्ये १७ गुन्हे केले आहेत. बुलेट वाहन चोरत दुकानांचे शटर तोडणारी ही कुप्रसिद्ध गँग आहे. शहरातील अलंकार मार्केट येथे २९ फेब्रुवारी २०२४ रोजी सात ते आठ बंद दुकानांचे शटर उचलून चोरी केल्याची खळबळजनक घटना समोर आली होती. पाच संशयितांनी शहरातील सात दुचाकी चोरी करून गुन्ह्यासाठी वापर केला होता. जुने शहर परिसरात देखील सात ते आठ बंद दुकानांमध्ये चोरी केली होती. त्या सात दुचाकीपैकी दोन बुलेट दुचाकी घेऊन चोरटे फरार झाले होते.




या घटनेचे गांभीर्य पाहता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांनी एक पथक गठीत करून आरोपींना निष्पन्न केले. पथकाने पाच संशयितांचा अहमदनगर जिल्ह्यापर्यंत पाठलाग केला होता. मात्र, ते फरार झाले होते. त्यावेळी पथकाने अमरावती (ग्रामीण) येथील आरोपी फरहान अहेमद अब्दुल गफ्फार याला अटक केली होती. आरोपीने त्याचे सोबत सुरेश नारायण (रेकुला रा. व्यंकटपुरा मैकाजीरी लोथेकुटा त्रिमुलगिरी हैदराबाद, तेलंगना), अशोक गंगाधर रेडडी (रा. हनुमंतपुरा अरूर, जि. बल्लापुर, कर्नाटका) हे दोघे असल्याची कबुली दिली होती. या दोन्ही आरोपींना सोलापूर येथून अटक करण्यात आली आहे. या आरोपींनी अकोला जिल्ह्यातील सहा गुन्ह्यांसह अमरावती (शहर), नागपूर ग्रामीण, वाशीम, हिंगोली जिल्ह्यातही बंद दुकानांमध्ये हात साफ केला आहे.कर्नाटक व तेलंगणा राज्यात देखील या टोळीवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. ही टोळी पोलीस कोठडीत असून स्थानिक गुन्हे शाखा पोलीस तपास करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि गोपाल जाधव, पोउपनि दशरत बोरकर, पोलीस अंमलदार गोकुळ चव्हाण, अब्दुल माजीद, महेंद्र मलिये, अविनाश पाचपोर, वसीमोद्दीन, उमेश पराये, खुशाल नेमाडे, आकाश मानकर, अभिषेक पाठक, स्वप्नील खेडकर, शेख अन्सार, लिलाधर खंडारे, चालक प्रशांत कमलाकर, मनिष ठाकरे, राहुल गायकवाड तसेच सायबर पोलीस ठाण्याचे आशिष आमले, गोपाल ठोंबरे यांनी केली आहे.

# अरे देवा ... मोबाईल टॉर्चवर रुग्णांवर उपचार

## हतरू आरोग्य केंद्रातील अजब प्रकार वीज बंद, सौर ऊर्जाही निकामी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चिखलदरा**

रुग्णही रात्रीच्या वेळी भरती असतात व रात्री बेरात्री इतर रुग्ण सुद्धा या ठिकाणी उपचारासाठी येतात. या ठिकाणी विद्युत नसल्यामुळे त्यांचे हाल होतात. तसेच या ठिकाणी सोलरचे लाईट बसविण्यात आले आहेत, तेही बंदच असतात. त्यामुळे डॉक्टरांना नाईलाजाने टॉर्च वापरून उपचार करावा लागतो, अशी भयानक स्थिती आजही मेळघाटात आहे.

या ठिकाणच्या नागरिकांना व उपचार करणार्या डॉक्टरांना सुद्धा उजेड मिळत नाही. अशावेळी रात्री प्रसूतीची रुग्ण आली तर या ठिकाणच्या डॉक्टरांची व रुग्णांच्या नातेवाईकांची चांगलीच फजिती होते. येथे तात्काळ सोलरचे लाईट बसविण्यात यावे अन्यथा या ठिकाणची इलेक्ट्रिक दुरुस्त करून विद्युत पुरवठा तरी सुरळीत करावा, अशी नागरिकांची मागणी आहे.

५ फेब्रुवारीच्या रात्रीपासून दवाखान्यात लाईट नसल्यामुळे डॉक्टर व कर्मचारी मोबाईलच्या लाईटने उपचार करत आहेत प्रसूती अंधारात करावी लागते. या ठिकाणी वीज नसल्यामुळे उपचार व्यवस्थित होत नाही तसेच रुग्णांचे व डॉक्टरांचे हाल होतात. तरी प्रशासनाने रुग्णालयात सोलर लाईट आणि पाण्याची सोय करावी अशी मागणी चिखलदरा पंचायत समितीचे माजी उपसभापती नानकराम ठाकरे यांनी केली आहे.

# वाहनधारकांनो खबरदार ! एचएसआरपी बुकिंगसाठी गुगल सर्चमध्ये पहिल्या संकेतस्थळावर क्लिक कराल तर बळी पडाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८ अमरावती**

राष्ट्रीय सुरक्षितता आणि वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने सर्व वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक केले आहे. याकरिता शासनाने एक बुकींग पोर्टल सुरू केले आहे. मात्र यातही आता सायबर गुन्हेगारांनी घुसखोरी केली असून अनेकांची आर्थिक फसवणूक होत आहे. गुगल शोधमध्ये पहिल्याच क्रमांकावर दिसणाऱ्या संकेत स्थळाद्वारे वाहन मालकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याच्या तक्रारी येत असून जिल्ह्यातील काही जणांच्या खात्यातून पैसे गेले आहेत. त्यामुळे एचएसआरपी बुकींग करताना शासनाचे अधिकृत पोर्टल आहे की बनावट याबाबत खात्री करावी लागणार आहे.



केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या अधिनियम ५० अन्वये महाराष्ट्र शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट अर्थात एचएसआरपी बसविण्याची तरतुद करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसर एचएसआरपी बसविणे सक्तीचे करण्यात आले आहे. मात्र यातही आता आर्थिक लूट आणि फसवणूक सुरू झाली आहे. १ एप्रिल २०१९ च्या आधीच्या गाड्यांना एच.एस.आर.पी साठी http://maharashtrahsrp.com हे पोर्टल निश्चित करण्यात आलेले आहे. मात्र ऑनलाईन बुकींग करण्यासाठी संकेत स्थळावर जी पहिली लिंक येते ती एच.एस.आर.पी बुकिंग सेवांसाठी गुगल शोधमध्ये पॉप अप झाली आहे. शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर चुकून व्यवहार झाल्यास रद्द करता येतात तसे येथे करता येत नाहीत. गुगल वर हे पहिलेच संकेतस्थळ असल्याने अनेक जण याच लिंकवर क्लिक करतात आणि आर्थिक फसवणुकीला बळी पडतात. विशेष म्हणजे यासंदर्भात तक्रार करण्यासाठी मी उप प्रादेशिक परिवहन विभागात गेली असता हा आमचा विषय नसल्याचे सांगून तेथील अधिकाऱ्यांनी हात वर केले, त्यामुळे तक्रार कुठे करायची असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## प्रतिक्रिया

दिल्ली विधानसभे मध्ये भारतीय जनता पार्टीने ऐतिहासिक विजय मिळवलेला आहे. जनतेचा भाजपावर पूर्ण विश्वास आहे. अंधेरा छटेगा सुरज निकलेगा कमल खिलेगा हे अटलजींच भाकीत आज खऱ्या अर्थाने सत्यात उतरलेल आहे. देशाचे यशस्वी लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांचा चेहरा व त्यांच्यावरील विश्वास तसेच गृहमंत्री माननीय अमित शहाचे प्लॅनिंग व भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री जगतप्रसादजी नड्डा यांनी केलेली रणनीती व दिल्लीच्या जनतेने केजरीवाल वर दाखवलेला अविश्वास यामुळेच तब्बल २७ वर्षांच्या अथक संघर्षानंतर भारतीय जनता पार्टी दिल्लीमध्ये आपली सत्ता काबीज करू शकली.यमुना सफाई, स्वच्छ नलजल तसेच भारताची राजधानी कशी असावी याच एक मॉडेल भारतीय जनता पार्टी पुढील काळात निश्चितच उभ करणार आहे. हा विजय अतिशय सकारात्मक असून देशाच्या व दिल्लीच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. माननीय नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात भारताला महासत्ताक बनवण्यास आता कोणीही रोखू शकत नाही हा विश्वास वाटतो.



**सुरेखा दिगंबर लुंगारे**
**भाजपा महाराष्ट्र निमंत्रित सदस्य, मा नगरसेविका.**

# प्रयागराजच्या महाकुंभ मेळा क्षेत्रातून हिंदू संघटनांची केंद्र सरकारकडे मागणी

## केवळ अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेश नव्हे, तर संपूर्ण जगातील पीडित हिंदूंना भारतात आश्रय मिळावा!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८प्रयागराज**

आज केवळ अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेशमध्येच नव्हे, तर श्रीलंका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, इंडोनेशिया, अमेरिका, इंग्लंड यांसारख्या अनेक देशांमध्ये हिंदूंवर अत्याचार होत आहेत. त्यांच्यावर भेदभाव, जबरदस्ती धर्मांतर, सामाजिक आणि आर्थिक त्रास दिला जात आहे, तसेच त्यांच्या मंदिरांवर आणि उत्सवांवर हल्ले होत आहेत. अशा परिस्थितीत संपूर्ण जगभरातील हिंदू केवळ भारताकडे आशेने पाहत आहेत. जसे की, जगाच्या कोणत्याही कोपर्यात असलेल्या ज्यू लोकांवर संकट आले, तर त्यांचे संरक्षण करण्यासाठी इस्रायल तत्पर असतो, त्याचप्रमाणे भारतानेही संपूर्ण जगभरातील हिंदूसाठी संरक्षण देणारा आणि त्यांच्या पाठी खंबीरपणे उभा रहाणारा देश असायला हवे.

नागरिकत्व सुधारणा (उ--) कायद्याचा विस्तार करून संपूर्ण जगातील पीडित हिंदूंना संरक्षण देण्याचे कार्य भारत सरकारने करावे. तसेच वर्ष २०१९ मध्ये लागू केलेला सीएए कायदा सर्व राज्यांमध्ये त्वरित लागू करण्यात यावा. ही महत्त्वाची मागणी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे यांनी प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यातील पत्रकार परिषदेतून मांडली. या वेळी तामिळनाडूतील 'हिंदु मक्कल कच्छी'चे संस्थापक श्री. अर्जुन संपत, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस आणि हिंदु



जनजागृती समितीचे पूर्व आणि ईशान्य भारताचे धर्मप्रचारक सद्गुरु नीलेश सिंगबाळ उपस्थित होते.

तामिळनाडूतील हिंदु मक्कल कच्छीचे संस्थापक अध्यक्ष श्री. अर्जुन संपत यांनी सांगितले की , श्रीलंकेत हिंदूवर अद्यापही अमानुष अत्याचार होत आहेत. त्यांना श्रीलंकेत दुय्यम दर्जाचे नागरीक म्हणून वागवले जाते. हिंदूंची मंदिरे उद्ध्वस्त केली जात आहेत आणि हिंदू मुलींचे जबरदस्तीने मुसलमानांशी विवाह लावले जात आहेत. त्यामुळे श्रीलंकेत हिंदू लोकसंख्या घटत आहे. अशा स्थितीत भारत सरकारने श्रीलंकन हिंदूंच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. त्याचप्रमाणे, अमानुष अत्याचारामुळे भारतात आलेल्या श्रीलंकन हिंदू निर्वासितांना भारतीय नागरिकत्व देण्यासाठी सीएए कायद्यात सुधारणा करावी.सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी सांगितले की , काश्मिरी हिंदू विस्थापनानंतरही स्वतःच्या देशात निर्वासित म्हणून राहत आहेत, हे अत्यंत दुर्दैवी आहे. कलम ३७० आणि ३५ए हटवणे हा महत्त्वाचा निर्णय होता, परंतु आजवर भारत सरकारने विस्थापित काश्मिरी हिंदूंच्या पुनर्वसनासाठी कोणतीही योजना घोषित न करणे आश्चर्यकारक आहे. आमची मागणी आहे की, निर्वासित काश्मिरी हिंदूंसाठी जम्मू-काश्मीरमध्ये 'पनून कश्मीर' नावाचा स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश तयार करण्यात यावा. काश्मिरी हिंदूंच्या सुरक्षेची आणि पुनर्वसनाची पूर्ण जबाबदारी केंद्र सरकारने तत्काळ घ्यावी.हिंदु जनजागृती समितीचे पूर्व आणि ईशान्य भारताचे धर्मप्रचारक सद्गुरु नीलेश सिंगबाळ यांनी सांगितले की , हिंदु जनजागृती समितीने या महाकुंभ क्षेत्रातील सेक्टर ६ मध्ये बांगलादेश आणि काश्मीरमधील हिंदूंवरील अमानवीय अत्याचारांविषयी जनजागृतीसाठी चित्रप्रदर्शन आयोजित केले आहे. समाजामध्ये हिंदूंवरील अत्याचारांविषयी जागरूकता निर्माण करणे हे या प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.